म. ग्रं.

| विषय | लेखक भाप |
| --- | --- |
| निबंध | (स्वदे |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव |
| ५ / ७६ | (मू |


७

सं क्र.

वेदांतिक

(मूळ,

निबंध

# A LECTURE AND NOTICES ON THE VEDAS,

BY

**Dr. MARTIN HAUG, PH. D.,**

PROFESSOR OF SANSCRIT IN THE POONA COLLEGE &c.

TRASLATED

BY

**A SVADESH HITECHHU.**

# वेदांविषयीं,

## डाकृतर मार्तिन हौग,

पुणे विद्यालयांतील संस्कृत विद्येचे मुख्य गुरु,

यांच्या व्याख्यानाचें व निबंधांतील कांहीं अंशाचें

भाषांतर,

एक स्वदेश हितेच्छु

यानें करून

मुंबईत

इंदुप्रकाश छापखान्यांत छापिलें.

शके १७८५.

सन १८६३.

किंमत ५ आणे.

# प्रस्तावना.

वेदांवर, डाक्तर मार्तिन हौग साहेब, पुणें विद्यायांतील संस्कृत विद्यागुरु, यांनीं कांहीं दिवसांमागें "यंगमेन्स असोसिएशन" या सभेपुढें दोन व्याख्यानें वाचलीं; त्यांतील विषय एतद्देशीय लोकांस समजावा हें फार योग्य व उपयोगी आहे, असें त्या दिवशीं व्याख्यान ऐकण्यास जमलेल्या बहुतेक लोकांचें म्हणणें असल्यावरून, त्यां पैकीं पहिल्या व्याख्यानाचें भाषांतर यथामति करून वाचणारांस सादर केलें आहे. तसेंच युरोपखंडांत मोक्ष मुल्लर नामें मोठा नामांकित संस्कृत विद्वान आहे, त्यानें ऋग्वेदसंहिता, सायनाचार्यांच्या भाष्यासहित, छापून प्रसिद्ध करण्याचा क्रम चालविला आहे, त्या पैकीं चवथा भाग नुकताच तयार झाला, त्यावर डाक्तर हौग यांनीं आपला विचार तीन निबंधांत छापून प्रसिद्ध केला आहे. त्यांतीलही कांहीं भागाचें भाषांतर फार उपयुक्त असल्यावरून या पुस्तकांत सामील केलें आहे. या विषयाचें महत्व आपणा हिंदुलोकांस किती आहे आणि आपण स्वतः बद्धपरिकर होऊन आपल्या ह्या मौल्यवान वैदिक पुस्तकांचा मार्मिक रीतीनें विचार करणें हें किती आवश्यक आहे हें हें लहानसें पुस्तक वाचलें असतां बरेंच लक्षांत येईल यांत संशय नाहीं. आपल्या धर्माची स्थिति पूर्वीं होती कशी आणि आतां आहे कशी या गोष्टीचें दिक्प्रदर्शन या लहानशा पुस्तकांत केलें आहे. त्याचाच ऊहापोहकरून विचार केला असतां त्या पासून अनेक उपयुक्त विचार सुचतील असें वाटतें. या पुस्तकास ज्या रीतीचा आश्रय मिळेल त्या प्रमाणें दुसऱ्या व्याख्यानाचा तर्जमा करून छापवण्याची भाषांतर कर्त्यास उमेद येईल. पुढील भाषांतरांत ज्या विद्वानास जे दोष आढळतील त्यांनीं ते कृपा करून पत्रद्वारा प्रसिद्ध केल्यास भाषांतर कर्ता ते आभार पूर्वक स्वीकारील आणि दुसरी आवृत्ति छापणें झाल्यास तींत तें दुरुस्त करील.

सं. नि. ७६

# वेदांविषयीं.

आज ज्या विषयावर व्याख्यान देणें आहे तो मोठा व्यापक आहे व कांहीं अंशीं गूढ आहे, याकरितां येथें त्यांतील बारीक गोष्टींचा विचार न करितां मुख्य वेद ह्मणजे काय आणि त्यांत विषय कोणता आहे इत्यादि जें त्याचें साधारण स्वरूप तें मात्र संक्षिप्त रीतीनें सांगतों. परंतु केवळ हिंदुलोकांच्याच नव्हे, तर सर्व मनुष्यजातीच्या व त्यांत विशेषतः आर्य लोकांच्या मनाची प्राचीन काळापासून स्थिति आपण पाहूं लागलों असतां आपणांस ती समजण्यास वेद हें मोठें साधन आहे याविषयीं मला थोडेंसें बोलणें आहे.

हिंदुस्थानास वेदांचें महत्व अतिशयित आहे. कारण, या हिंदुस्थानाची भूमि ह्मणजे आत्मविचारादि अनेक विचारांचें केवळ अगरच होय. हिजमध्यें आज सहस्रावधि वर्षांत धर्मसंबंधी अथवा तत्वविचार संबंधी अथवा लोकसंबंधी ज्या असंख्य गोष्टी उदयास आल्या, अनेक प्रकारच्या कल्पना निघाल्या व नानाविध व्यवस्था झाल्या त्या सर्वांचें वास्तविक अथवा काल्पनिक मूळ हे वेदच होत. या वेदांच्या प्रामाण्याचा अंमल कोट्यावधि ज्ञाते लोकांच्या मनांवर पराकाष्ठेचा होता व अद्यापि आहे. या ज्ञाते लोकांत किती एक तर मोठ्या गंभीर विचाराचे व मर्मज्ञ असे सांपडतील. धर्माचा इतिहास अथवा मनुष्यमात्राच्या मनाचा इतिहास यांचा विचार करणाऱ्यानें असल्या प्रकारच्या मौल्यवान पुस्तकांकडे फार चांगलें लक्ष दिलें पाहिजे. हिंदु व विशेषतः ब्राह्मण ह्यांच्या या धर्मसंबंधी पुरातन लेखांच्या अभ्यासाकडे युरोपखंडांतल्या विद्वानांचें लक्ष मुख्यत्वें करून याच हेतूनें लागलें आहे. आह्मांस या सर्वमान्य अत्यंत प्राचीन लेखांची माहिती जरी अगदीं आलीकडे (कोल्ब्रूक साहेबानें वेदावर लिहिलेले निबंध छापून प्रसिद्ध झाल्यावर ह्मणजे सुमारें साठ वर्षांपासून कायती आह्मांस वेदांची माहिती झाली.) होऊं लागली आहे तरी, युरोपामध्यें व विशेषतः जर्मनींत व इंग्लं-

सं. २०६

# वेदांविषयीं.

आज ज्या विषयावर व्याख्यान देणें आहे तो मोठा व्यापक आहे व कांहीं अशीं गूढ आहे, याकरितां येथें त्यांतील बारीक गोष्टींचा विचार न करितां मुख्य वेद ह्मणजे काय आणि त्यांत विषय कोणता आहे इत्यादि जें त्याचें साधारण स्वरूप तें मात्र संक्षिप्त रीतीनें सांगतों. परंतु केवळ हिंदुलोकांच्याच नव्हे, तर सर्व मनुष्यजातीच्या व त्यांत विशेषतः आर्य लोकांच्या मनाची प्राचीन काळापासून स्थिति आपण पाहूं लागलों असतां आपणांस ती समजण्यास वेद हें मोठें साधन आहे याविषयीं मला थोडेंसें बोलणें आहे.

हिंदुस्थानास वेदांचें महत्व अतिशयित आहे. कारण, या हिंदुस्थानाची भूमि ह्मणजे आत्मविचारादि अनेक विचारांचें केवळ अगरच होय. हिजमध्यें आज सहस्रावधि वर्षांत धर्मसंबंधी अथवा तत्वविचार संबंधी अथवा लोकसंबंधी ज्या असंख्य गोष्टी उदयास आल्या, अनेक प्रकारच्या कल्पना निघाल्या व नानाविध व्यवस्था झाल्या त्या सर्वांचें वास्तविक अथवा काल्पनिक मूळ हे वेदच होत. या वेदांच्या प्रामाण्याचा अंमल कोट्यावधि ज्ञाते लोकांच्या मनांवर पराकाष्ठेचा होता व अद्यापि आहे. या ज्ञाते लोकांत किती एक तर मोठ्या गंभीर विचाराचे व मर्मज्ञ असे सांपडतील. धर्माचा इतिहास अथवा मनुष्यमात्राच्या मनाचा इतिहास यांचा विचार करणाऱ्यानें असल्या प्रकारच्या मौल्यवान पुस्तकांकडे फार चांगलें लक्ष दिलें पाहिजे. हिंदु व विशेषतः ब्राह्मण ह्यांच्या या धर्मसंबंधी पुरातन लेखांच्या अभ्यासाकडे युरोपखंडांतल्या विद्वानांचें लक्ष मुख्यत्वें करून याच हेतूनें लागलें आहे. आह्मांस या सर्वमान्य अत्यंत प्राचीन लेखांची माहिती जरी अगदीं आलीकडे (कोल्ब्रूक साहेबानें वेदावर लिहिलेले निबंध छापून प्रसिद्ध झाल्यावर ह्मणजे सुमारें साठ वर्षांपासून कायती आह्मांस वेदांची माहिती झाली.) होऊं लागली आहे तरी, युरोपामध्यें व विशेषतः जर्मनींत व इंग्लं-

दांत वेदांतल्या विषयांचा शोध फारच उत्कंठेनें व झपाट्यानें चालला आहे, त्यामुळें वेदांच्या किती एक भागांतल्या विषयांचें सामान्य स्वरूप अमुक प्रकारचें आहे व संस्कृत ग्रंथांत वेदांचें महत्व अमुक रीतीचें इतकें आहे असें मोघम सांगतां येईल हें तर काय ; परंतु त्यांतील विषय वाचून ते कांहीं अंशीं समजण्याचीही शक्ति आह्मास आली आहे. वैदिक विषयांमध्यें आमचा प्रवेश इतका त्वरित होण्यास मुख्य साधन प्राचीनकाळच्या कितीएक विद्वानांचे श्रमच आहेत. कांहीं विद्वानांनीं मोठ्या परिश्रमानें, सामान्य नियमांनीं सिद्ध न होणारे असे वेदांतले विशेष प्रयोग शोधून काढून त्यांकरितां व्याकरणाचे नवीन नियम केले. कांहीं विद्वानांनीं सर्व वेदांवर पांडित्ययुक्त व्याख्यानें केलीं. उदाहरण, पाणिनि, कात्यायन आणि पतंजलि हे वरसांगितल्या प्रकारचे महान महान वैय्याकरण झाले; आणि यास्क (निरुक्त ह्मणून वेदांग आहे त्याचा कर्ता,) शंकराचार्य (उपनिषदें व वेदांतपर लेख यांवरच्या भाष्यांचाकर्ता,) आणि सायनाचार्य (स्तोत्रें अथवा सूक्तें आणि प्रार्थना यांजवरचा भाष्यकार) हे महान महान व्याख्याकार व भाष्यकार झाले. या विद्वानांच्या ग्रंथांच्या तोडीचे ग्रंथ ग्रीक लोकांत नाहींत. पांडित्य, नियम, व्यवस्था व व्यक्तपणा यागुणांविषयीं अलेक्जांद्रिया शहरांतील ग्रीक विद्वानांच्या ग्रंथांपेक्षां या हिंदु विद्वानांच्या ग्रंथांची मातवरी अधिक आहे. ज्या थोड्याशा युरोपियन विद्वानांनीं या ग्रंथांचा अभ्यास केला आहे त्यांस त्यांचें अत्यंत आश्चर्य वाटतें. व्याकरणशास्त्रकर्ते व त्यांत विशेषतः पाणिनि यांच्या ग्रंथांचा उपयोग अर्वाचीन भाषाशास्त्रास होऊं लागला आहे आणि अर्वाचीन जें भाषातारतम्यशास्त्र त्यास तर अनेक गोष्टींमध्यें हिंदु वैय्याकरणांच्या ग्रंथांचें साह्य झालें आहे. उदाहरणार्थ, धातु आणि प्रातिपदिकें यांचीं स्वरूपें निराळीं दाखविलीं आहेत आणि कृत्., ताद्धित, समास इत्यादि साधित शब्दांचे उत्पादक नियम केले आहेत ते पाहावे.

जों जों प्राचीन काळच्या हिंदु विद्वानां विषयीं वाखाणणी करावी, तों तों पुढचे हिंदुलोक आपल्या पूर्वजांच्या लेखांवर ज्यास्ती विचार न करितां ते घोटीतच बसले हें पाहून अंतःकरणास विशेष खिन्नता येते. हिंदुलोकांच्या या स्थिती मुळें पुढें होणारे स्वतंत्र विचार व शोध अगदीं व बंद पडले.

हिंदुस्थानांत या वेदांचें विवरण सायनाचार्यांच्या वेळेपासून आलीकडे म्हणजे सुमारें ४०० वर्षांत अगदींच वाढलें नाहीं. याचें कारण वैदिक विषयांच्या अभ्यासावरचें लक्ष अगदीं उडालें हेंच खचीत होय. हें लक्ष इतकें उडालें आहे कीं, या विषयाचें पुनरुज्जीवन न झाल्यास वेदाच्या फार प्राचीन भागांतील विषयांचें ज्ञान या हिंदुस्थानाच्या भूमिके वरून लवकरच विलयास जाईल. वेदभाष्यें आहेत तीं कोणी पाहात नाहींत. जे थोडेसे युरोपियन लोक संस्कृतांत विद्वान झाले ते जर न जपते व न श्रम करते तर सायनाचार्याची व्याख्या व दुसरे कितीएक मोठमोठे मौल्यवान ग्रंथ नष्ट होते यांत संशय नाहीं. कारण, फार प्राचीन काळच्या कांहीं मौल्यवान ग्रंथांचीं जीं पुस्तकें अद्यापि क्वचित क्वचित आहेत तीं प्रायः लवकरच कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडणारीं अथवा वाण्यांच्या दुकानीं जाणारीं अशीं आहेत.

हिंदुलोकांनीं वेदविषयांचे विचार ज्या पायरीवर सोडून द्यावे त्याच पायरी पासून युरोपियन, म्हणजे एतद्देशीय लोक दृष्ट्या म्लेंछलोक, यांनीं ते पुढें चालू करावे ही एक चमत्कारिक गोष्ट आहे. हिंदूंच्या प्राचीन काळच्या ऋषींस अथवा त्यांच्या वेदभाष्यकर्त्यांस जर ही गोष्ट कळती तर त्यांस मोठा अचंबा वाटता व भीतीनें त्यांच्या आंगावर रोमांच उभे राहते. मताभिमानी व धर्मभोळे अशा ब्राह्मणांस, युरोपखंडस्थ विद्वान लोक वेदांवर विचार करतात हें म्हणणें खोटें भासेल, परंतु वस्तुतः ही गोष्ट खरी आहे. वेदावर धर्मसंबंधानें जो पूज्यताग्रह आहे तो पाहिजे तशा रीतीनें त्यांचा विचार करण्यास हिंदूलोकांस मोठा प्रतिबंध आहे. हा प्रतिबंध युरोपियन लोकांस नसल्यामुळें त्यांमधलें विचार करणारे विद्वान लोक खरे, प्रामाणिक व ऋजुबुद्धीचे असल्यास ते त्या प्राचीन ग्रंथांचा विचार, प्रस्तुतच्या बहुतेक हिंदुलोकांपेक्षां विशेष, निष्पक्षपातपणें करूं शकतील. आणि या विचारास आवश्यक जो साधनकलाप तो मिळाल्यास ते आपल्या भाषाशास्त्राच्या विशेष चांगल्या आधारानें अत्यंत प्राचीन काळाचें, म्हणजे ऋषि होते त्या काळाचें खरें व पूर्ण स्वरूप अखेरीस जाणतील. युरोपियन लोक या विचारांत मन न घालते तर अर्वाचीन ब्राम्हणांच्यानें तसें स्वरूप जाणणें कधींच होतेंना. परंतु माझी मनापासून अशी इच्छा आहे कीं वेद हे ब्राह्मणांचेच पवित्र लेख

असल्या मुळें त्यांचा विचार करण्याचा प्रथम हक्क त्यांचाच आहे. त्यापक्षीं त्यांनीं या कृत्यांत युरोपियन विद्वानांच्या मागें पडूंनये, तर या मौल्यवान प्राचीन विद्येच्या अभ्यासाविषयीं त्यांज प्रमाणेंच उत्सुकता धरून परिश्रम करावे. प्राचीन काळच्या ग्रंथांच्या अभ्यासांत आपलीं सर्व आयुष्यें घालविणें यांत युरोपियन लोक जर साफल्य व धन्यता मानतात तर ब्रम्हणांनीं त्यांचा कित्ता कां घेऊं नये. हिंदुस्थानांतील धर्माची स्थिति प्रस्तुत अशा आणी बाणीच्या दशेस येऊन पोहोंचली आहे, कीं हिंदुधर्मास आधारभूत अशा ग्रंथांचा मन लावून फार चांगला विचार करणें भाग आहे असें एतद्देशीय विद्वान लोकांस लवकरच दिसून येईल.

आतां हें विषयांतर सोडून देऊन व्याख्यानाच्या वास्तविक विषयाकडे येऊं.

वेद् शब्दार्थ काय हें प्रथम सांगणें आहे. ह्या शब्दाचे अर्थ बहुत आहेत. याचा अवयवार्थ म्हटला म्हणजे ज्ञान. या सामान्य अर्थी याचा प्रयोग भलत्या पाहिजे त्या विषयाकडे होतो. उदाहरण, धनुर्वेद म्हणजे तीरंदाजीची विद्या; गंधर्ववेद म्हणजे मांत्रिक विद्या; परंतु आलीकडे संगीत शास्त्रास म्हणजे गायनविद्येस गंधर्ववेद म्हणतात. प्राचीन काळीं वेद् याचा अर्थ जो हल्लीं शास्त्र याचा अर्थ आहे तोच होता म्हटलें तरी चालेल; म्हणजे तो अर्थ, विद्येच्या कोणत्या ही प्रकरणावर आधारभूत असा एखादा अभिमत ग्रंथ, हा होय.

धर्मसंबंधी विषय ज्यांत आहेत अशा ग्रंथांचें महत्व सहजच विशेष अ[illegible] त्यामुळें वेद् शब्दाचा प्रयोग मुख्यत्वें करून तसल्या पवित्र ग्रंथांकडेच केलेला आहे. कारण, यांतीलच विषयाचें परिज्ञान ब्राम्हणांनीं मुख्यत्वें करून संपादावें आणि या विषयाचें ज्ञान संपादण्यांतच त्यांस कृतकृत्यता आहे असें मानित होते. परंतु या अर्थानें पाहिलें तरी पुनः वेद शब्दाचा अर्थ अस्पष्ट व साधारण असाच झाला. धर्माचे ग्रंथ ही पुष्कळ झाले तितक्या सर्वांस हा शब्द लागत नाहीं; वास्तव याचा अर्थ वर सांगितल्या पेक्षां विशेष मर्यादित आहे.

वेद याचा तसा मर्यादित अर्थ, संहिता, म्हणजे मंत्रभाग, **ब्राह्मण**, आणि **आरण्यक** म्हणजे ज्यांत उपनिषदें आहेत तीं हा होय. ह्यापेक्षां कांहींसा व्यापक

अर्थ घेतला म्हणजे कर्मप्रदर्शक जीं श्रौत व स्मार्त सूत्रें तींही वेदशब्द वाच्य होतात. परंतु प्रमाणभूत ग्रंथ अशा अभिप्रायानें वेद याचा अगदीं मर्यादित अर्थ म्हटला म्हणजे, ज्यांत पौरुष लेख नाहीं असे देवांनीं ऋषींस उपदेशरूपानें सांगितलेले ग्रंथ असा होय. वेद हे देवांनीं ऋषींस दिलेले ग्रंथ होत हा समज लोकांत कधीं पासून पडला हें निश्चयानें सांगवत नाहीं. इतकें मात्र खरें आहे कीं ज्या वेदशब्दप्रतिपाद्यग्रंथांस अर्वाचीन एतद्देशीय लोक, ते साक्षात देवांनीं दिलेले, असें मानितात त्यांस प्राचीन काळीं असें कोणी मानीत नसे.

प्रत्येक वेदांत तीन भाग आहेत.—संहिता, ब्राह्मण आणि उपनिषदांसहित आरण्यक. असे वेद चार आहेत, ऋक्, यजुष्, साम आणि अथर्वण. हे पुराण मतें ब्रह्मदेवाच्या मुखापासून आले आहेत. फार प्राचीन ग्रंथ म्हणजे मनुस्मृति वगैरे यांवरून पाहतां या चार वेदां पैकीं वेदत्वें करून अभिमत असे ऋक्, यजुष् आणि साम हे तीनच होते असें दिसतें. **त्रैविद्या** म्हणजे त्रिविध ज्ञान ही संज्ञा याच तीन वेदांस लागते. अथर्वण अथवा अथर्वांगिस (अथर्वन् आणि अंगिरस् यांचीं वाक्यें ) या वेदाचे पाठक तो वेद देवप्रणीतच आहे असें सर्वांनीं मानावें म्हणून पुष्कळ प्रयत्न करीत होते (या वेदाचें गोपथ नामक ब्राह्मण आहे त्यांत ही गोष्ट स्पष्ट आहे. ) तरी वहुत काळपर्यंत त्यास वेद असें मानीत नसत. प्रयत्न वहुत काळपावेतों सफळ न होण्याचीं कारणें अनेक आहेत.

ज्या यज्ञयागादि कर्माकरितां त्रैविद्या म्हणजे दुसरे तीन वेद प्रणीत आहेत त्या कर्मांत अथर्व वेदाची पूर्वीं गरज नव्हती असें दिसतें. तो देवप्रणीत आहे असें मानूं लागल्या नंतर त्यास ब्रह्मवेद ( ब्रह्मा म्हणून जो यज्ञकर्मांत ऋत्विज असतो त्याचा वेद ) असें म्हणत असत. मोक्षमुल्लर यानें प्राचीन संस्कृत ग्रंथांचा इतिहास फार उत्तम लिहिला आहे त्यांत तो म्हणतो कीं, यज्ञकर्मांमध्यें वशीकरणाकरितां अथर्व वेदाची फार प्राचीन काळा पासूनच गरज होती. परंतु माझें मत असें नाहीं. कारण, दुसऱ्या वेदांमध्येंही वशीकरणाचे मंत्र आहेत. आणि कांहीं ठिकाणीं तर त्यांविषयीं पुष्कळ सूक्ष्म विचारही केला आहे. आथर्वणिक म्हणजे अथर्वणवेदपाठक

यांस आपल्या ग्रंथांस वेद म्हणवण्या विषयीं मोठी खटपट पडण्याचें दुसरें कारण या ग्रंथांचा प्रतिपाद्य विषय हलकट पडला हें होय. त्यामध्यें जादूचे, शापाचे वगैरे मंत्र आहेत, म्हणजे राजे व त्यांचे उपाध्याय यांस शत्रूवर जय इत्यादि मिळवण्याच्या उपयोगीं पडण्या साठीं जारण, मारण, उच्चाटन, स्तंभन, मोहन इत्यादिकांचे मंत्र लिहिले आहेत. यांखेरीज अथर्व वेदाच्या संहितेंत कांहीं विचित्र गोष्टी आहेत त्या धार्मिष्ट ब्राह्मणांस मोठ्या भयंकर वाटतील. उदाहरणार्थ त्यांतली एक येथें लिहितों. अथर्ववेद संहितेचीं वीस कांडें आहेत त्यांपैकीं १५ व्या गद्यरूप कांडांत व्रात्याची म्हणजे ज्याचे मुंज वगैरे संस्कार झाले नाहींत असा म्हणजे अर्थात वहिष्कृत अशा पुरुषाची परमेश्वर बुद्धीनें फार स्तुति केली आहे. ऋग्वेदाच्या परम पवित्र ऋचा ज्यांचीं सामें गातात त्या व यजुर्वेदाचीं वाक्यें या व्रात्यास गुरु मानून अनुसरतात. वहिष्कृत पुरुषास एवढा मान देणें हें धर्माभिमानी अशा ब्राह्मणांस कधींही पसंत पडणार नाहीं. सामवेदाच्या ब्राह्मणाचे ( पंचविंश अथवा तांड्य ब्राह्मण आणि लाट्यायन सूत्र यांचे ) कर्ते यांसही या व्रात्याचें परिज्ञान आहे. आणि व्रात्य म्हणजे जन्मतः आर्य असून जो मनुष्य द्विजधर्माचें आचरण करीत नाहीं तो होय असा अर्थ ते समजतात तरी व्रात्यष्टोम म्हणून जो संस्कार अथवा प्रायश्चित आहे तें करण्यास तो तयार असेल तर त्यास द्विजजातींत घेण्यास हरकत नाहीं असें या ग्रंथ कर्त्यांचें मत आहे. यावरून त्या काळांतल्या समजुतींत आणि या काळांतल्या समजुतींत केवढा फरक पडला तो पहा! प्राचीन काळच्या सिद्ध पुरुषांनीं ज्याचें जन्मही ब्राह्मण जातींत झालें नाहीं अशांचाही संग्रह त्या जातींत करण्यांस अनुमोदन दिलें आणि हल्लींचे एतद्देशीय भिक्षुक व शास्त्री लोक ब्राह्मणानें युरोप खंडास जाणें हें महापातक मानितात, आणि जाणारास पुढें यावज्जीव वहिष्कृत असें समजतात केवढें अंतर हें!

आतां पुनः अथर्व वेदाकडे वळूं. वर लिहिलेल्या गोष्टींवरून असा सिद्धांत होतो, कीं प्राचीन ऋषींच्या काळापासून परंपरया जें जें चालत आलें तें तें सर्व मोठें व पूज्य असें जेव्हांपासून ब्राह्मण लोक मानूं लागले तेव्हांपासूनच अथर्व ग्रंथ वेदत्वें करून संमत झाले. ही संमति पाणिनीच्या का

ळाच्या पूर्वीं झाली होती असें वाटत नाहीं. पाणिनि हा इ. स. पूर्वीं तीन चार शें वर्षें झाला असावा असें अनुमान आहे. हा अथर्वांगिरस वेदाच्या नांवाचा कोठेंच उल्लेख करीत नाहीं. बाकीच्या तीन वेदांची त्यास चांगली माहिती असून त्यांतील शब्दांच्या सिद्धतेविषयीं त्यानें बहुत नियम केले आहेत. फक्त दोन सूत्रांत ( अ. ४, पा. ३, वि. ७, सू. १३ आणि अ. ६, पा. ४, वि. ९, सू. १३. ) आथर्वणिक शब्द त्यानें लिहिला आहे. यांत असा नियम सांगितला आहे कीं आथर्वणिक शब्देंकरून "आथर्वणिकांचा" असा अर्थ विवक्षित असल्यास त्याशब्दाच्या शेवटच्या इक प्रत्ययाचा लोप होऊन केवळ अथर्वण असें होतें. महाभाष्यांत पतंजलि लिहितो, कीं या सूत्रांत या शब्दाचा अर्थ आथर्वणिक लोकांचे लेख व त्यांचें काम असा आहे.

वरील सर्व लेखापासून असें सिद्ध होतेंकीं, सुमारें पाणिनीच्या वेळेस ह्मणजे २२०० वर्षांपूर्वीं ब्राम्हणलोक तीनच वेद मानीत होते. आतां या तीन वेदांचे निरनिराळे भाग तपासून पाहून त्यांत ईश्वरप्रणीत अथवा प्राचीन असे कोणते आहेत आणि कोणते नाहींत याची परीक्षा करूं. या गोष्टीचा निर्णय करण्यास पाणिनीचें व्याकरण आपणास चांगलें साधन होईल. मागें सांगित्या प्रमाणें अगदीं मर्यादित अर्थ घेतला असतां प्रत्येक वेदाचे तीन भाग आहेत.

१ प्रथमभाग **संहिता** अथवा मंत्रभाग म्हणजे छंदोबद्धऋचा, सूक्तें, आणि स्तोत्रें हीं होत. कोणत्याही वेदाचा हा मंत्रभाग अत्यंत प्राचीन होय. त्याच्या पढण्याच्या निरनिराळ्या प्रकारावरून त्यास संहिता, पदें, क्रम अशीं निरनिराळीं नांवें पडलीं आहेत. ऋग्वेद संहिता म्हणजे ऋग्वेदाच्या मंत्रांच्या अर्धेल्या अथवा अर्धेमंत्र यांतले अनेक शब्द निरनिराळे तोडून न म्हणतां सगळीं अर्धें हेच मोठे लांब शब्द असल्या प्रमाणेंच म्हटलेला अथवा लिहिलेला मूलग्रंथ. पदें म्हणजे पुढच्या व मागच्या शब्दांशीं जुळणीचा संबंध न ठेवितां स्वतंत्र रीतीनें तोडून म्हटलेले शब्द हे दोन प्रकार अगदीं सोपे आहेत. आणि ब्राह्मण ह्मणून जे वेद ग्रंथ आहेत त्यांच्या कर्त्यांस अवगत होते. आलीकडे कल्पनेनें अनेक नवीन विकृति काढून त्याही प्रघातांत आणिल्या आहेत. त्या क्रम, जटा, घन, रेखा या होत. यांमध्यें प्रत्येक पद अनेक वेळां म्हणावें लागतें व कांहींमध्यें तर दहा पेक्षां अधिक वेळांही तें म्हणावें लागतें.

२ द्वितीय भाग **ब्राह्मण** होय. यांत यज्ञ कर्मांत मंत्रांची योजना, यज्ञ कर्माचें मूळ, शब्दांचा अर्थ, अनेक प्रकारचे यज्ञ फार सुयंत्र रीतीनें शेवटास नेण्या विषयींच्या सर्वोत्कृष्ट पद्धति हीं सांगितलीं असल्यामुळें वेदांतल्या किती एक विषयांवर ही एक व्याख्याच होय. हीं ब्राह्मणें हल्लींच्या लोकांस कदाचित असंबद्ध व अप्रयोजक ( स्वतः मोक्ष मुल्लर असें म्हणतो ) अशीं वाटतील परंतु हिंदुस्थानच्या प्राचीन काळाचा इतिहास व विशेषतः एतद्देशीय लोकांच्या मनाच्या स्थितींत कसकसा फेरफार होत गेला या गोष्टीचा इतिहास हे समजण्या विषयीं हे भाग अत्यंत उपयोगी आहेत. कारण ब्रह्मविद्या, तत्वविद्या, व्याकरण शास्त्र या विषयांचा विचार करण्यास प्रथम प्रयत्न या ब्राह्मण नांवाच्या ग्रंथांतच झाला. यांत सांगितलेल्या अनेक कथांवरून कांहीं कांहीं यज्ञकर्मांच्या मूळांचें स्पष्टीकरण होतें. त्यामुळें प्राचीन काळच्या हिंदु लोकांच्या स्थितीविषयीं या ब्राह्मणां पासून जसें आम्हास स्पष्ट ज्ञान होतें तसें मंत्र भागांवरून होत नाहीं. देवांस संबोधून असलेलीं जीं स्तोत्रें, गाणीं, प्रार्थना इत्यादि त्यांनीं झालेल्या मंत्र भागावरच ब्राह्मण ग्रंथ प्रवृत्त झाले आहेत, यावरूनच मंत्रभाग हा ब्राह्मणांच्या पूर्वकालचा आहे असें साफ सिद्ध होतें. तथापि कांहीं जुन्या ब्राह्मणां मध्यें अत्यंत प्राचीन, यज्ञ कर्म संबंधी व प्रार्थना पर अशीं वाक्यें अढळतात; आणि तीं जरीं त्याच वेदाच्या मंत्र भागांत उपलब्ध होत नाहींत तरी बहुतेक मंत्र जितके प्राचीन आहेत तितकीं प्राचीन तीं आहेत. उदाहरण, यज्ञांत पशु मारण्याचें **अध्रिगुप्रैष मंत्र** यानांवाचें वाक्य आहे. हें ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणांत व त्याच्याच आश्वलायन शाखेच्या श्रौत सूत्रांत आढळतें. परंतु ऋग्वेदाच्या संहितेंत आढळत नाहीं. तरी त्यांतील शब्दांच्या रूपांवरून आणि भाषेच्या व रचनेच्या शैलीवरून तें अत्यंत प्राचीन काळचें आहे असें दिसतें.

ब्राम्हणांत प्राचीन आणि अर्वाचीन असे दोन भेद पाणिनि करितो.( अ. ४, पा. ३, वि. ६, सू.९ ) "पुराण प्रोक्तेषु ब्रह्मण कल्पेषु" हें सूत्र सांगतें कीं प्राचीनांनीं ( ऋषींनीं ) पठित जीं ब्राह्मणें आणि कल्प ( सूत्रें ) त्यांचीं मात्र नांवें शेवटास इन् प्रत्यय लागून होतात. उदाहरण, शाट्यायन यापासून शाट्यायनिन्, ऐतरेय यापासून ऐतरेयिन् इत्यादि. यावरून हा प्रत्यय शेव-

र्टी लागून ज्या ब्राह्मणांचीं नावें झालीं नाहींत, तीं ब्राह्मणें प्राचीनत्वें करून अभिमत नाहींत, तर तारतम्यानें पाहतां नवीन आहेत. अशा रीतीचें शतपथ ब्राह्मण हें नवीन आहे. याचा कर्ता याज्ञवल्क्य नामक प्रसिद्ध ऋषि होय, या ग्रंथाच्या कितीएक भागांस मिळून **यज्ञावल्कानि ब्राह्मणानि** असें ह्मणतात. हें प्राचीन ऋषिपाठित असतें तर **याज्ञवल्कीनि ब्राह्मणानि** असें रूप होतें. कात्यायन आणि पतंजलि हे यां ब्राह्मणाचें प्राचीनत्व राखण्याच्या हेतूनें या शब्दा करितां त्या इन् प्रत्यय विधायक* सामान्य शास्त्राचा एक विशेष अपवाद करितात. परंतु पाणिनीच्या सूत्रांवर काशिकावृत्ति म्हणून एक फार सुंदर व्याख्या आहे, तींत स्पष्ट सांगितलें आहे कीं जुन्या दंतकथांवरून याज्ञवल्क्यानि ब्राह्मणानि ( श्वेतयजुर्वेदाचें शतपथ ब्राह्मण ) म्हणजे याज्ञवल्क्य ऋषीनें केलेलें ब्राह्मण हें तारतम्यानें पाहातां कांहींसें नवीन आहे आणि ऐतरेय इत्यादि ब्राह्मणांच्या आलीकडचें आहे. यावरील लेखांवरून असा सिद्धांत होतो कीं, शतपथ ब्राह्मण हें पाणिनीस माहीतच नव्हतें आणि असलेंच तर तो तें अगदी नवीन असें मानीत असेल.

**प्रोक्तम्** या शब्दाचा अर्थ पठित ( केलेलें ) याच शब्दानें पाणिनीनें सर्व ब्राह्मणें व शौनक ज्या मंत्राचा ऋषि आहे असे मंत्र ( अशा प्रकारचें ऋग्वेदाचें द्वितीय मंडल आहे, हें पूर्वीं गृत्समद ऋषीपासून परंपरेनें आलेलें होय. ) यांचा संग्रह केला ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे. कारण, पुढच्या काळच्या हिंदु ऋषींचा चोहोंकडे असा समज होता, कीं वेदाचे सर्व भाग म्हणजे संहिता, ब्राह्मण आणि आरण्यक हीं ऋषींनीं पाहिलीं म्हणजे ऋषि योग समाधींत एकाग्र बसले असतां देवतांनीं तीं त्यांस दिलीं आणि त्यांनीं तीं आपल्या अतींद्रिय ज्ञानानें पाहिलीं "दृष्ट" ( पाहिलेलें ) हा शब्द पाणिनीस अवगत होता व त्याचा अर्थ देवतांपासून प्राप्तझालेलें ज्ञान अथवा उपदेश असा असतो हेंही विदित होतें तरी त्यानें ब्राह्मणास अथवा आरण्यकास तो शब्द लाविला नाहीं, सामांस म्हणजे सामवेदाच्या ऋचांस मात्र लाविला आहे. ( अ. ४, पा. २ सू. ७. दृष्टंसाम. ) यांपैकी कितीएक मुख्य मुख्य सामांचीं "कालेयं" "वामदेव्यं" अशीं नांवें त्यानें सा-

---

*"कयानश्चित्र आभुवत्" हा मंत्र होय. हा हल्लीं ग्रहणा मध्यें जपतात.

गितलीं आहेत. ( एकंदर १४०० सामें आहेत आणि प्रत्येकास निराळें नांव आहे. ) अनेक वेदांच्या निरनिराळ्या शाखांचीं नांवें एका अध्यायांतील सूत्रांत आहेत, तो सर्व अध्याय ( अ. ४, पा.३, वि. ६ सू १. ) तेनप्रोक्तं ( त्यानें पठित ) या सूत्राच्या अधिकारामध्यें, पाणिनीनें सांगितला, ही गोष्ट त्याच्या सूत्रांवर व्याख्या करणारे कात्यायन व पतंजालि यांस मोठी अडचणीची झाली. ते दोघेंही अशी शंका घेतात, कीं वेदाच्या शाखा "त्यानें पठित" अशा हा ( पाणिनि ) म्हणतो कसा? कारण वेद हे दुसऱ्या ग्रंथा प्रमाणें केलेले नाहींत, तर ते नित्य आहेत. ही अडचण पतंजलीनें स्वतःच मोठ्या चमत्कारिक रीतीनें दूर केली आहे. तो म्हणतो नित्य याचा अर्थ ते केलेले नव्हेत असाच नाहीं, तर ते अविनाशी आहेत असा. याव' एकाच वेदाच्या शाखांमध्यें निरनिराळे पाठ पडले आहेत. तेव्हां अविनाशित्व कसें अशी शंका आली, तिचेंही निराकरण तो खालीं लिहिल्या प्रमाणें करितो. वर्णानुपूर्वी किंवा शब्दानुपूर्वी सर्वत्र एकच असली पाहिजे असा नित्य याचा अर्थ नाहीं, तर त्या आनुपूर्वीचा अर्थ अविनाशी आहे असा. या व्याख्येवरून वेदाची वर्णानुपूर्वीच उपदिष्ट झाली असें जें मत तें तो अगदीं मानीत नाहीं.

३ तृतीय भाग उपनिषदांसहित **आरण्यक** होय. हे ग्रंथ ब्राह्मणाच्या पुरवण्या अथवा परिशिष्टें आहेत. यांची रचना ब्राह्मणांच्या रचने सारखी आहे. यांत यज्ञ कर्मांचें विवरण आहे. व जीवात्म्याविषयींच्या मोठमोठ्या अनेक गोष्टी, मुक्तिमार्ग, ब्रह्मस्वरूप, जगताची उत्पत्ति इत्यादि विषयांवर उत्तम प्रकारचा विचार आहे. हे वैदिकग्रंथ खचीत ( ब्राह्मणाच्या ) आलीकडचे आहेत. पाणिनीस हे मुळीच माहित नव्हते असें दिसतें. आरण्यक आणि उपनिषद हे शब्द त्याच्या सूत्रांत अढळतात खरे; परंतु त्यांचा अर्थ, "ग्रंथ" असा नाहीं. तर आरण्यक म्हणजे वनवासी म्हणजे वनांत रहणारा मनुष्य असा आहे. वेदाच्या ग्रंथांविषयीं पाणिनीचें मत एकंदरीनें पाहतां असें म्हणण्यास चिंता नाहीं कीं सामवेद मात्र ( सामवेदाच्या ज्या ऋचा ऋग्वेदांत अढळतात त्या मात्र, यजुर्वेदांतल्या नाहींत. ) देवप्रणित आणि बाकीचे सर्व ग्रंथ पौरुष. पाणिनि इ. स. पूर्वींच्या चवथ्या श

तकांत होता, यावरून विचार करितां असें दिसतें कीं, पुढें ज्या ग्रंथांस लोक देवप्रणीत मानूं लागले ते ग्रंथ त्याच्या वेळीं [illegible] प्रमाणें संपूर्ण नव्हते.

आरण्यक आणि ब्राह्मण यां विषयीं आपण [illegible] विचार करूं. वेदाच्या या भागांत जेवढे मंत्र म्हणून आहेत तेवढे सर्व ईश्वर प्रणीत आहेत असें मानितात. परंतु ब्राह्मणांचे कर्ते आप आपल्या ग्रंथास, हे ईश्वर प्रेरणे पासून झालेले असे मानीत नाहींत. उपनिषदांचे कर्त्ते मात्र आपल्या ग्रंथास हे ईश्वर प्रेरणेनें झालेले असें मानितातसें दिसतें.

वेदाच्या मंत्रभागांत म्हणजे संहितेंत, ते ईश्वरदत्त आहेत असें अनेक प्रसंगीं अढळतें. परंतु ऋग्वेदांतलींच अशीं कितीएक उदाहरणें आहेत, कीं त्यांवरून, मंत्र व स्तोत्रें स्वतः आपणच केलीं, दैविक शक्तीपासून तीं आपणांस उपदिष्ट झालीं नाहींत असें ऋषींनीं स्पष्ट मान्य केल्या प्रमाणें दिसतें. उदाहरणें, ( ऋग्वेदांत ) ब्रह्मकृत् सूक्तांचा कर्ता बृहदुक्थ ऋषि यानें मान्य आणि सुंदर असें एक स्तोत्र इंद्रास उद्देशून ह्मटलें आहे. (—) वसिष्ठ ऋषि आपल्या एका स्तोत्रांत म्हणतो ( वयंतु ते दाश्वांसः. ) स्तोत्रें करून ( अथवा रचून ) तुला आहुति देऊं. गोतम कुळांतले ऋषि म्हणतात ( एवा ते हरियोजना. ) या प्रमाणें गोतमांनीं तुजकरितां सुंदर प्रार्थना केल्या आहेत.

चार वेदां पैकीं प्रधान ऋग्वेद होय. त्यांत मुख्यत्वें करून त्याचा मंत्रभाग म्हणजे संहिता ह्मणतात ती होय. सर्व जगामध्यें प्राचीन ग्रंथ कदाचित हाच असावा. मोक्ष मुल्लर याच्या मतें याची रचना इ. स. पूर्वीं सुमारें १०००—१२०० वर्षें झाली होती. परंतु या काळाच्या अधीं फार वर्षें त्याची रचना झाली होती असें सिद्ध करण्या विषयीं सबल कारणें आहेत. ज्योतिष[1] म्हणून जें एक वेदांग आहे, त्यांत वेदाच्या उत्पत्तिकालाच्या सुमारा विषयीं कांहीं शोध लागण्याचा मार्ग आहे. हा लहानसा ग्रंथ लगध ऋषीनें केला आहे. ज्योतिष शास्त्राच्या दुसऱ्या ग्रंथांच्या कर्त्यां पेक्षां हा फारच प्राचीन आहे. या लगध ऋषीच्या ज्योतिषांत अयनवृत्तांचीं संपातस्थलें

---

१ याच्या आरंभींचे शब्द "पंचवत्सरमयं." ब्राह्मण आपल्या नित्य कर्मांत हे अद्यापि नेहमी ह्मणत असतात.

सांगितलीं आहेत, त्या आधारावरून वेदांच्या उत्पत्तिकालाचा सुमार समजण्या साठीं कोल्ब्रूक साहेबानें गणित केलें त्यापासून इ. स. पूर्वीचें चवदावें शतक आलें. कलकत्ता येथें आर्च् दीकन प्रात यानें त्यावर तपासणी करून इ. स. पूर्वींच ११८१ वें वर्ष आणिलें. आतां हें वर्ष त्या ज्योतिषाच्या उत्पत्तीचें असें सिद्ध झालें; वेदाच्या उत्पत्तीचें नव्हे. वेदाचे ग्रंथ पुढें जीं वेदांगें झालीं त्याहून फारच पुरातन असले पाहिजेत. या ज्योतिषाची भाषा व शैली फार प्राचीन दिसते. अथर्व वेदाच्या संहितेंतही ( १९.८ ) नक्षत्रांच्या नांवांमध्यें अयनवृत्तांच्या संपातस्थळांविषयीं सूचना आढळते. तिजवरून अथर्ववेद या ज्योतिषाच्या अधीं ४८० वर्षें झाला होता असें निघतें, म्हणजे त्याची रचना इ. स. पूर्वींच्या १६५० वर्षांच्या आलीकडे झालेली नाहीं. भाषेच्या स्वरूपावरून अथर्ववेद हा ऋग्वेद संहितेच्या फार प्राचीन भागा पेक्षां अर्वाचीन असल्या वरून ऋग्वेद संहितेचा उत्पत्तिकाळ इ. स. पूर्वीं १८००–२००० वर्षां मध्यें असावा असें सिद्ध होतें. म्हणजे अब्राहाम ज्या काळीं होता तो काळ होय.

सगळी ऋग्वेदसंहिता ही एकच काळीं झालेली अथवा एकाच कर्त्यानें केलेली अशी नाहीं. ही बहुत ऋषींनीं म्हणजे सिद्धांनीं केली आहे. हे ऋषि फार प्राचीनकाळीं हिंदुस्थानांतील आर्य लोकांत प्रमुख होते, आणि ब्राह्मण धर्माचे खरे संस्थापक हेच होते. ब्राह्मण जातीमध्यें ऋषींच्या नांवावरून गोत्ररूप अनेक वर्ग केलेले अद्यापि कायम आहेत. त्या त्या वर्गांतले ब्राह्मण त्या त्या ऋषीचें नांव आपल्या वंशास लावतात. फार प्राचीन काळीं ऋषींमध्यें जातिभेद कोठें दिसत नाहीं. ऐतरेय ब्राह्मण ( १२–१९ ) यांत असें अढळतें कीं सोमरस काढण्या करितां शुद्धोदक लागतें त्याच्या प्रार्थनेचें एक प्रसिद्ध सूक्त ( प्रदेवत्रा० ) आहे तें कवश ऐलुश म्हणून एक दासीपुत्र होता त्यानें पाहिलेलें व त्यासच अवगत होतें या पुत्रास अब्राह्मण असें स्पष्ट म्हटलें आहे. याला ऋषींनीं यज्ञमंडपांतून हाकून दिलें होतें. परंतु यास वरील सूक्त उपदेशानें मिळाल्या नंतर त्यांनीं त्यास परत घेतलें. वेदाच्या नवीन सूक्तांत आणि ब्राह्मण ग्रंथांत ब्राह्म

ण ही एक जाति आहे असें सांपडतें. परंतु अध्यापनाचा म्हणजे शिकव-ण्याचा अधिकार केवळ त्या जातीसच होता असें नाहीं. कारण, छांदोग्य उपनिषद (५—३) यांत असें सांपडतें कीं गोतम ऋषीनें पांचाळ देशाच्या राजाकडे जाऊन अध्ययन सांग असें म्हटलें. गोतम तेथें असें बोलल्याचें आढळतें "ब्राह्मणास यागोष्टी पूर्वी कधीं माहीत नव्हत्या म्हणून या पृथ्विवर-ल्या सर्व लोकांमध्यें या विषयाचें अध्यापन करण्याचा अधिकार केवळ क्ष-त्रियासच आहे." त्या काळीं विपुल द्रव्य मिळालें असतां शूद्रास अध्यापन करण्याविषयींही निषेध करीत नव्हते. याचें उदाहरण, छांदोग्य उपनिषद (४—२) यांत जनश्रुती नामक शूद्रराजाकडून रक्व्य नांवाच्या ब्राह्मणानें अध्ययन करविलें असें सांपडतें. उपनिषदांवरचा प्रसिद्धभाष्यकार शंकराचार्य (इ. स. पूर्वीच्या ८ शकांत झाला) यास या गोष्टीची मोठी अडचण पड-ली. महान् ऋषी असून त्यानें आपला जातिधर्म इतका सोडिला, कीं शूद्रा-कडून (वेदाचें) अध्ययन करविलें. हा दोष घालविण्यासाठीं शंकराचार्यानें शूद्रशब्दाचा अवयवार्थ ओढून ताणून निरनिराळ्या प्रकारचा दाखविला आहे. या शूद्रशब्दाचा अर्थ शूद्रजातीचा मनुष्य नव्हे, असें ह्मणून त्यानें त्याचे दोन अर्थ केले आहेत. पहिला अर्थ शुक ह्मणजे शोक या शब्दापा-सून शूद्र शब्द झाला. (त्याचा अर्थ ज्यास शोक प्राप्त झाला आहे तो.)कारण शंकराचार्य ह्मणतो कीं त्या राजास आपल्या मंदिरावरून उडत जणारे दोन राजहंस कांहीं बोलले होते तें ऐकून शोक झाला होता. दुसर अर्थ, शूद्र शब्दाचा प्रथम शू हा श्रु (ऐकणें) या धातूपासून घ्यावा आ-णि दुसरा भाग द्र हा द्रु (पळणें) या पासून घ्यावा. ह्मणजे सगळ्या श-ब्दाचा अर्थ क्व्याची स्तुती ऐकून जो राजा पळाला" परंतु व्याकरण दृ-ष्ट्या पाहिलें असतां या व्याख्या सयुक्तिक नाहींत. आणि वैदिक ग्रंथांतही शूद्र शब्दाचा अर्थ सर्वकाळ "कनिष्ठ जातिचा मनुष्य" हा एकच आढळतो.

वंशब्राह्मणांत सामवेदाच्या अध्यापकांच्या नांवाची याद दिली आहे. ति-जवरून, वेदाचें अध्यापन करण्याचा अधिकार ब्राह्मण जातीसच होता असें नाहीं. तर परदेशच्या मनुष्याचाही वेदाध्यापक मंडळींत प्रवेश होत असे असें समजतें. त्या यादींत औपमन्यव या कांबोजाचें नांव सामवेदाच्या प्र-

सिद्ध अध्यापकांत घातलें आहे. मनुस्मृति व रामायण यावरून पाहतां की चीज हे परदेशस्थ व नीच लोक होते व त्यांशीं व्यवहार करण्यास ब्राह्मणास प्रतिबंध होता असें समजतें.

प्राचीन काळीं ऋग्वेदसंहितेचे दहा भाग केले होते. त्या प्रत्येकास मंडल असें ह्मणतात. पुढें तिचे आठ भाग केले, त्यांस अष्टक ह्मणतात. यांतील सूक्तांचा अनुक्रम ज्या ऋषींस तीं उपदेशानें मिळालीं त्यांच्या अनुक्रमाप्रमाणें अथवा विषयांच्या अनुक्रमाप्रमाणें आहे. उदाहरण, तिसऱ्या मंडलांत महानृऋषि जो विश्वामित्र (कौशिक) याचीं सूक्तें आहेत; सातव्या मंडलांत विश्वामित्राचा प्रतिस्पर्धी वसिष्ठ याचीं आहेत. नवव्या मंडलांत यज्ञकर्मासाठीं सोमवल्लीपासून काढलेल्या रसाच्या पवित्रीकरणाचीं जेवढीं सुक्तें आहेत तेवढीं सर्व आहेत. (त्यास पावमानी ह्मणतात.) सगळ्या संहितेंत १०,०० रां पेक्षां अधिक ऋचा आहेत. ऋक् ह्मणजे एक मंत्र अथवा श्लोक. यापासूनच यास ऋग्वेद हें नांव पडलें. याचें प्राचीन नांव पाणिनि व यास्क यांस माहीत होतें. तें ब्व्हृच (वहुतऋचा) हें होय. यांत वहुतकरून निरनिराळ्या देवतांस उद्देशून केलेल्या प्रार्थना आणि स्तोत्रें हींच फार आहेत. या ऋचांची योजना प्राचीन काळीं व प्रस्तुतकाळीं यज्ञयागादि कर्माकडे आहे. आणि ज्या कृतीविषयीं ज्या मंत्राची योजना आहे त्या कृतीला आणि त्या मंत्राच्या अर्थाला चांगला मेळ आहे, यावरून असें अनुमान निर्विवाद होतें कीं, ते मंत्र यज्ञ यागादि कर्माकरितां ऋषींनींच रचिले असावेत. सूक्तांचा अर्थ आणि कृति यांचा संबंध कितीएक ठिकाणीं इतका निकट आढळतो कीं, कृतीचें ज्ञान यथास्थित झाल्यावाचून सूक्ताचा पुरा अर्थ समजत नाहीं. याविषयीं उदाहरण, विश्वामित्राचें सूक्त "इमंनोयज्ञं प्रमृतेषू०" अर्थ, हा आमचा याग देवांस पावीव; हे जातवेदा (अग्ने,) आमच्या हवनास अनुकूल हो. वपायाग (यज्ञांत मारलेल्या पशूच्या आंतड्यावर त्वचेचा पातळ पडदा असतो त्यास वपा ह्मणतात तिचा होम.) ह्मणून एक विशेष विधि आहे, त्याच्या कृतीकडे हें सूक्त योजिलेलें आहे असें समजल्याशिवाय याचा अर्थ बरोबर समजणें कठीण आहे. पशूचें हें वपारूप अंग ह्मटलें ह्मणजे मोठें प्रधान हवि आहे. ही भाजण्याकरितां अग्नीवर धरितात तेव्हां तिजवर

तुपाचें सिंचन करतात, त्यास यज्ञकर्मांत पारिभाषिक शब्द **अभिघारण** हा आहे. खालीं गळणाऱ्या तुपाच्या बिंदूच्या स्तुतीकरितां वर लिहिलेलें सूक्त आहे. ब्राह्मण ग्रंथांत लिहिले आहे कीं, असें केलें असतां तेच बिंदु पर्जन्याच्या बिंदूच्या रूपानें परिणत होऊन ( ज्यावर्षी याग होतो ) त्यावर्षी अवर्षण पडत नाहीं.

ज्या देवतांस हविर्भाग मिळतो त्यांसच संबोधून मंत्र आहेत. यांतील प्रधान देवता ह्मटल्या म्हणजे अग्नि, हा स्वतःच ऋत्विज (उपाध्याय) आणि देव व मनुष्य या उभयतांचा मध्यस्थ आहे, इंद्र हा मेघनादाचा व युद्धाचा स्वामी होय; वरुण हा स्वर्ग व पृथ्वी यांचा शास्ता आहे. सोम हा वनस्पतीचा स्वामी होय; **वायु**, वारा; **उषस**, ह्मणजे प्रातःकाळ; सूर्य; **मरुत**, वादळांचे अधिकारी देव; **सरस्वती**, सकल ज्ञानाची देवता; विष्णु, (याचें पुराणांत जसें मोठें प्राधान्य वर्णिलें आहे तसें वेदांत नाहीं[1]) ह्मणजे सूर्य इत्यादि कांहीं कांहीं सूक्तांत मुळीं देवतेचा शोधच लागत नाहीं. परंतु प्राचीन काळच्या शौनक (हा इ. स. पूर्वी सुमारें ७००—८०० या वर्षाच्या मध्येंच झाला असावा) आदिकरून ऋषींच्या मतें प्रतिसूक्तास देवता असलीच पाहिजे, ह्मणून ज्या सूक्ताच्या ऋचांत देवतेच्या नामाचा उल्लेख नसेल त्यास कांहीं काल्पनिक प्रकार काढून देवता योजतात. यास उदाहरण, एक जुगार खेळणारा मनुष्य जुगारापासून आपला व आपल्या कुटुंबाचा नाश झाला; या साठीं आपलें जुगार खेळण्याचें व्यसन सुटावें म्हणून प्रार्थना करितो अशा अर्थाचें एक सूक्त (साम) आहे. याचें विवरण करणाऱ्यांस यांत देवता आढळली नाहीं. ह्मणून त्यांनीं **अक्ष** (फासा), हीच देवता आहे असें ठरविलें. कांहीं सूक्तांत साक्षात् देवतोल्लेख नसून कः (कोण) हें प्रश्नार्थक सर्वनाम आहे, तीच देवता कल्पून देवतांच्या यादींत कः ही एक नवी देवता सामील केली, आणि तिचें, देवांचा पिता, प्रजापति याशीं ऐक्य मानिलें.

कवितेच्या दृष्टीनें पाहतां कांहीं सूक्तें फार सुंदर आहेत. **उषस्** (प्रभातकाळ) यास उद्देशून जीं सूक्तें आहेत तीं कविता सौंदर्य व नवीन कल्पना

१ ऋग्वेद ब्राह्मणाच्या आरंभीं "अग्नि अवम" आणि "विष्णु परम" असें आहे. त्याचा अर्थ स्थलगत उच्च निचभाव आहे; प्राधान्य अथवा अप्राधान्य असा नाहीं.

याविषयीं फार प्रसिद्ध आहेत. असल्या सूक्तांच्या ऋचांतून कांहींचें भषांतर येथें लिहितों (इदं श्रेष्ठं ज्योतिषां ज्योतिः) सोमयागामध्यें मुख्य दिवशीं प्रातःकाळीं प्रातरनुवाक म्हणजे सकाळची प्रार्थना करितात तींत ही ऋचा आहे. हिचा ऋषि म्हणजे द्रष्टा कुत्स हा होय

"१ हा प्रकाशांत उत्तम प्रकाश आला आहे. ही सुंदर शोभा नूतन झालेली (आकाशामध्यें) सर्वत्र पसरत आहे. ती सूर्यास खचीत आणील (आणि मग अदृश्य होईल) जशी रात्र (कृष्णा) इनें पहाटेसाठीं आपलीं स्थानें सांडिलीं आहेत (तशी पहाट सूर्यासाठीं सोडील.)

३ दोघी बहिणी (रात्र आणि पहाट) एकच अवधिशून्य मार्ग एकामागून एक क्रमीत असतात. याप्रमाणें त्या ईश्वरानें शिकविलेल्या (आहेत.) त्या एकमेकींवर (कधीं) आदळत नाहींत व (कधीं) स्तब्धही राहत नाहींत; रात्र आणि पहाट दिसण्यांत निराळ्या दिसतात, तरी एक मताच्या असल्या मुळें दोन्हीही (मिळून) आह्मांस दवानें सुखी करोत.

११ ज्या मर्त्यांनीं तिला प्रकाशतांना प्राचीन कालीं पाहिलें ते गेले. आतां हा सुंदर देखावा आह्मी उपभोगीत आहों. आणि लवकरच (आह्मी मेल्यानंतर) पुढची संतति उदयास येईल, ती पुढच्या पहाटा पहाणारी. ती (पहाट) तरुण भार्येप्रमाणें स्मित करणारी मनुष्यांची उत्तम मैत्रीण आहे. ती आकाशाची कन्या; ती अमर आहे; काल तिला स्पर्श करूं शकत नाहीं."

देवतांच्या नामनिर्देशकरून जीं सूक्तें आहेत त्यांखेरीज ज्यांत त्यांचा साक्षात् नामनिर्देश नसून कांहीं विशेषणांनीं मात्र त्या सूचित आहेत अशीं हीं सूक्तें पुष्कळ आढळतात. या सूक्तांच्या भाषेची रचना व शैली अगदीं सांकेतिक व गूढ आहेत. आणि सर्व वेदांच्या ब्राह्मण ग्रंथांत शब्दावर व कर्मावर असल्याच रीतीचे जे गूढविचार पुष्कळ आहेत ते पुढें येणार अशीं सूचकच जशीं काहीं सूक्तें आहेत. ( म्हणजे या सूक्तांच्या काळा पासूनच असें लिहिण्याची परिपाठी पडली. ) शेवटच्या मंडलांतल्या कांहीं सूक्तांतच हिंदुलोकांच्या अंतःकरणास महानमहान विचारकरण्याचा कल आहे असें साफ आढळतें. ज्या काळांत उपनिषदें झालीं त्या काळीं विचाराचा प्रसार फार झाला होता. ज्यांत परमेश्वराविषयीं खरोखर मोठे प्रौढ व गंभीर वि-

चार आहेत असल्या एका सूक्तांच्या कांहीं ऋचांचें भाषांतर येथें लिहितों. असें एक सूक्त ( हिरण्यगर्भः समवर्त्तताग्रे) धर्मनिष्ठ ब्राह्मण नित्य कर्मांत नेहमीं म्हणत असतात.

"१ आरंभीं हिरण्य गर्भ ("सोन्याचें मूळ" हें सर्व विश्वास व्यापण्याच्या अशा प्रधान तत्वाचें नांव आहे ) असता झाला; जें ( कांहीं ) आहे त्याचा स्वामी असा हाच एक झाला. त्यानें पृथ्वीला आणि आकाशाला स्थिर केलें. ज्यास आम्ही यज्ञ अर्पावा असा देव कोणता आहे.?

२ जो आपल्या शक्तीच्यायोगें श्वासोच्छ्वास टाकणाऱ्या व जागृत होणाऱ्या जगाचा एकच स्वामी आहे तो जो सर्वांस ( म्हणजे ) मनुष्यांस आणि पशूंस राखतो तो. ज्यास आह्मी यज्ञ०?

५ ज्याची शक्ति ते हिमाचल पर्वत, ज्याची शक्ति सागर आकाशसंबंधी नद्यांसह प्रसिद्ध करतो तो. ज्याचे हे प्रदेश ह्मणजे जसे काय दोन भुजच आहेत तो. ज्यास आह्मी० ?"

परमेश्वराविषयीं विचार पाहिले असतां वेदांतील बहुतेक सूक्तांत ते अस्पष्ट आहेत. त्यांच्या वैदिक विद्येचें स्वरूप पाहिलें ह्मणजे अनेक देव आहेत, हें मत मुख्य आहे. एकंदर देवांची संख्या तेहतीस आहे असें अनेक वाक्यांवरून दिसतें ; परंतु ज्यांस हविर्भाग देतात असे सर्व देव गणिले तर ती संख्या फारच वाढेल. वर सांगितल्याप्रमाणें अनेक देव आहेत हें मत मुख्य आहे तरी देव एकच ह्मणजे सर्वोत्तम तत्व एकच आहे ही कल्पना ऋग्वेदाच्या सूक्तांत अगदींच नाहीं असें नाहीं. उदाहरण, ऋचा (इंद्रं मित्रं वरुणं०) अर्थ "इंद्र, मित्र, वरुण, अग्नि, आणि पक्षविशिष्ट गरुडा सारखा स्वर्गसंबंधी प्राणी (सूर्य) या विषयीं बोलतात; आणखीं यम, मातरिश्वा, यांविषयीं बोलतात ; परंतु या सर्वांपासून ज्ञानी लोक एकच ईश्वर समजतात." सर्व सृष्ट प्राण्यांचा जनक आणि देवांचाही जनक असा जो प्रजापति तोच सर्वांत प्रधान मानिला आहे. पुष्कळ वाक्यांपासून विशेषतः ब्राह्मणांतल्या वाक्यांपासून असें दिसतें कीं देव म्हणजे रोमन लोक जसे आपल्या बादशाहांस मानीत होते तसेच ज्यांस देवत्व दिलें होतें असे मनुष्य, दुसरें कांहीं नाहीं असें हमेष म्हणणात, कीं देवांस स्वर्गादिलोक यज्ञयागांच्या योगानें प्राप्त झाले. जो मर्त्य ते यज्ञ करीत आहे तोही स्वर्गारोहण करतो,

आणि देवांच्या मंडळींत राहतो. उपनिषद.च्या काळीं देवांची संख्या कमी झाली होती. ब्रह्म हेंच सर्व व्यापक महत्तत्व आणि तेंच परमेश्वरत्वेंकरून मानिलें होतें त्यांतल्याच कांहीं वाक्यांत ही पदवी ब्रह्मास न देतां रुद्रास ह्मणजे शिवास दिली आहे.

वेदांतील विषयावर ज्यास्ती विचार करण्यास आतां वेळ नाहीं. दुसऱ्या व्याख्यानांत कदाचित करतां येईल. येथें ऋग्वेदावरच विशेष विचार केला याचें कारण, दुसऱ्या वेदांचें प्राधन्य कमी आहे. सामवेदांत ह्मटलें म्हणजे यज्ञांमध्यें गावयाच्या ज्या ऋग्वेदाच्या ऋचा त्याच आहेत. आणि यजुर्वेदांत यज्ञाच्या कर्मांच्या कृतीचीं वाक्यें आहेत. सामवेद, यजुर्वेद, हे दोन्ही समजण्यास यज्ञाचें ज्ञान चांगलें असलें पाहिजे.

**प्रथम व्याख्यान संपलें.**

# निबंध १ ला.

मोक्ष मुलुर म्हणून जर्मनी देशाचा रहिवासी, संस्कृतांत एक मोठा विद्वान पुरुष आहे. त्यानें ऋग्वेदसंहिता, सायनाचार्य (सुमारें ४७५ वर्षांपूर्वी झाला) याच्या भाष्यासहित छापून प्रसिद्ध करण्याचा क्रम आज बहुतवर्षे चालविला आहे, हें इकडील लोकांस त्यांत विशेषत: इंग्लिश जाणणाऱ्यांस बहुत करून ऐकून तरीं माहीत आहे. मुळाच्या म्हणजे संहितेच्या शुद्ध प्रती या देशांत पुष्कळ उपलभ्यमान आहेत; परंतु भाष्याची शुद्ध प्रत एकही मिळणें अशक्यच असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां अर्थात अनेक अशुद्ध प्रती मिळवून त्या परस्पराशीं ताडून विचारानें एक प्रत उत्कृष्ट रीतीनें शुद्ध करायाची म्हणजे केवढ्या मेहनतीचें (विशेषत: युरोप खंडांत) काम आहे? इतकें असून पुन: छापण्यांत अशुद्ध न राहूं देणें हा एक मोठा भाग आहेच. तर इतकेही परिश्रम करून वेदाची पुस्तकें जशीं व्हावीं तशीं तो विद्वान पुरुष तयार करीत आहे हें पाहून संस्कृतांतील खरोखर विद्वानास निस्संशय मोठा आनंद होईल.

आलीकडे या संहिताग्रंथाचें चतुर्थ पुस्तक छापून तयार झालें आहे. याच्या आरंभीं मोठी प्रस्तावना आहे. तींत "ज्योतिषाच्या आधारावरून वेदांतील सूक्तांची रचना कधीं झाली ती वेळ काढतां येईल किंवा नाहीं ?" या प्रश्नाचा विचार केला आहे. सर विल्यम जोन्स, कोलब्रूक आणि कप्तान देवीस यांनीं प्राचीन ज्योतिषग्रंथांत लिहिलेल्या प्रमाणभूत गोष्टींवरून वेदांची रचना अथवा निदान त्यांतील सूक्तांचा संग्रह हा इ. स. पूर्वीं १२०० अगर १४०० म्हणजे आजपासून सुमारें ३०५० अगर ३२५० वर्षांपूर्वी झाला असावा असें ठरविलें. या प्राचीन जोतिष ग्रंथांत अयनवृत्तांतील संपातस्थलें दिलीं आहेत, त्यांत आणि प्रस्तुतच्या संपातस्थळांत २२ सापेक्षां [1]अधिक अयनांशांचें अंतर पडलें आहे. इतकें अंतर पडण्यास वर लिहिलीं तितकीं वर्षें झालीं असावीं असें गणिताच्या आधारानें त्यांनीं काढिलें. कलकत्यास आर्चदीकन प्रात याणें वरील गणिताधार तपासून पाहून इ. स.

१ एतद्देशीय बहुतेक ज्योतिष्यांच्या मतें सुमारें १८ अयनांशांचें अंतर आहे.

पूर्वीचें ११८१ वें वर्ष, ह्मणजे सर विल्यम जोन्स यानें जें आणिलें होतें तेंच वर्ष ठरविलें, आणि रेवरेंद मेन यानें ११८६ वें वर्ष ठरविलें. वरील गोष्टींस आधारभूत वाक्यें ज्योतिष म्हणून जें एक वेदांग[1] आहे त्यांत आहेत तीं अशीं:—

"प्रपद्येते श्रविष्ठादौ सूर्याचांद्रमसावुदक् ॥
सार्पार्धे दक्षिणार्कस्तु माघश्रावणयोः सदा ॥१॥
धर्मवृद्धिरपांप्रस्थः क्षपाऽऽह्रास उदग्गतौ ॥
दक्षिणेतौविपर्यस्तौ षण्मुहूर्त्यय नेनतु ॥२॥

यांचा अर्थ, "सूर्य आणि चंद्र हे श्रविष्ठा (धनिष्ठा) नक्षत्राच्या आरंभींच उत्तरेकडे वळतात. (यासच उत्तरायण ह्मणतात.) परंतु सूर्य दक्षिणे कडे सर्पस्वामिक जें नक्षत्र (आश्लेषा) त्याच्या मध्यावरून वळतो (यासच दक्षिणायन म्हणतात.) आणि हें (उत्तरे कडे व दक्षिणे कडे वळणें) नेहमीं माघ व श्रावण या मासांत (घडतें)."

"उत्तरायणांत दिवसाची वृद्धि आणि रात्रीचा ऱ्हास हीं पाण्याच्या एका प्रस्था (३२ पलें[2]) इतकीं होतात. दक्षिणायनांत दोन्ही उलट (म्हणजे दिनऱ्हास आणि रात्रि वृद्धि) होतात आणि (तें अंतर) सहामुहूर्तांच्या[3] गतीनें (होतें)"

मोक्ष मुल्लर हा म्हणतो कीं हा ज्योतिषग्रंथ इ. स. पूर्वींच्या तिसऱ्या शतकांत म्हणजे सुमारें २१५० वर्षांपूर्वीं झाला. परंतु तो खचीत त्या काळाच्या फारच पूर्वीं झाला असावा. या ग्रंथावरून दोन गोष्टी मोठया उपयुक्त सांपडतात. एक त्या काळच्या आणि प्रस्तुतच्या संपातस्थळांच्या मध्यें सुमारें २२ अंशांचें अंतर आहे. आणि दुसरी ब्राह्मणलोक हे हिंदुस्थानाच्या अगदीं उत्तरेस, म्हणजे काबूल देशाच्या व त्याच्या मध्यें जी सरहद्द आहे तिच्याही पलीकडे राहात होते. कारण, अति लहान दिवस व अति मोठी रात्र ह्यांच्या मध्यें सहामुहूर्तांचें अंतर सांगितलें आहे. तें हिंदुस्थानांत

१ छंद वेदाचे पाय, सूत्र हात, ज्योतिष डोळे, निरुक्त कान, शिक्षा नाक आणि व्याकरण तोंड अशीं सहा वेदांगें आहेत.

२. दीड औंसाचा अथवा सुमारें पाउणशेराचा एक पल होतो. हें प्राचीन काळीं एक [illegible]ली माप होतें.

३. ४८ मिनिटें अथवा २ घटिका म्हणजे एक मुहूर्त.

जेवढें पडतें त्यापेक्षां अधिक आहे, त्यावरून तो लिहिणारा ज्यास्ती उत्तर अक्षांशावरचा राहणारा असावा असें सिद्ध होतें. "अपांप्रस्छ" ह्याचा अर्थ मोक्षमुल्लर यानें "पाण्याच्या एकाप्रस्छा इतकीं" असा सोमकर नावाच्या व्याख्याकारास अनुसरून लिहिला. हा व्याकरण दृष्ट्या त्या शब्दांपासून निघणें कठिण दिसतें. सूर्याच्या उत्तरायणांत घडणाऱ्या ज्या **घर्मवृद्धि** म्हणजे दिवस वाढणें आणि **क्षपाऱ्हास** म्हणजे रात्र कमी होणें, इत्यादि गोष्टी आहेत. त्यांतलीच "अपांप्रस्छ" ही एक आहे, हें उघड आहे. अधिक उत्तरेकडे असणाऱ्या देशांत उत्तरायणाचें घर्मवृद्धि आणि क्षपाऱ्हास याशिवाय अणखी असें एक असाधारण चिन्ह आहे कीं, त्यांतील वर्फ वितळून पाण्याचा प्रसार होतो; आणि **अपांप्रस्थः** याचा हाच अर्थ येथें विवक्षित आहे. पाण्याच्या एका प्रस्छा इतकीं असा अर्थ विवक्षित असता तर घर्मवृद्धि या विशेष्याचें अपांप्रस्छः हें विशेषण करण्याकरितां **अप्प्रस्थ परिमाणिका** अशा कोणत्या एखाद्या प्रकारानें प्रस्छशब्दाचा विशेषणत्वेंकरून प्रयोग केला असता; अथवा प्रथमा विभक्ति न लावतां षण्मुहूर्त्ययनेनतु या प्रमाणें तृतिया विभक्ति लाविली असती. खेरिज अति लहान दिवस व अति मोठी रात्र याजमधील अंतर सहामुहूर्त असें स्पष्ट सांगितल्या नंतर पुनः तेंच सांगण्या करितां पाण्याच्या एका प्रस्छा इतकीं असें सांगणें म्हणजे पौनरुक्त्य दोष आहे. आणि अशा लहानशा सूत्रतुल्य संक्षिप्त ग्रंथांत तर हा दोष अगदीं उपयोगी नाहीं.

घर्मशब्दाचा दिवस या अर्थीं प्रयोग करणें हें पाणिनीच्या अगोदरचा जो यास्कऋषि ( ख्रिस्तीशकाच्या पूर्वीं ४०० वर्षें झाला ) त्याच्या वेळेसच वेद झालें होतें; आणि या ज्योतिष ग्रंथांत तर तो केला आहे त्या पक्षीं हा ग्रंथ फार प्राचीन आहे; निदान मोक्षमुलर, ख्रिस्तीशकाच्या पूर्वीं तिसऱ्या शतकांत झाला म्हणून म्हणतो, त्या पेक्षां तरी फारच अगोदरचा आहे. मोक्षमुल्लर हा या ज्योतिषप्रामाण्याची फारशी वजनदारी न धरितां दुसऱ्या प्रमाणानें सिद्ध झालेल्या गोष्टीच्या बळकटीस हेंही एक साधन आहे असें मानितो. आमच्या दृष्टीनें या ज्योतिष वचनापासून ज्यास्ती अंशसिद्ध होतो. तो असा कीं, ख्रिस्तिशकाच्या पूर्वीं १२ व्या शतकाच्या आरंभीं म्हणजे सुमारें २०५०

वर्षांमागेंच ब्राह्मण लोकांनीं ग्रहांचे वेध घेऊन संपातस्थलें लिहिलीं आहेत; यावरून ते इतर गोष्टींमध्येंही पुष्कळ सुधारलेले असावे असें खचित सिद्ध होतें. या गोष्टीवरून जसें त्यांच्या सुधारणेचें अनुमानकरितां येतें तसें त्यांचे कुलपुरुष जे वेदद्रष्टे ऋषि त्यांच्या लेखावरून देखील करितां येत नाहीं. यज्ञयागादिकर्मे विशेष व्यवस्थेनें चालत होतीं. त्यावेळेस हे वेध, गणितें वगैरे केलीं आहेत. कारण, त्या कर्मासाठींच हें कालविधानशास्त्र म्हणजे ज्योतिष प्रवृत्त झालें आहे.[१] या ज्योतिषाच्या वेळेच्या सुमारासच यज्ञ यागादि कर्मे कशीं करावीं हें सांगणारीं श्रौतस्मार्त सूत्रें झालीं. मोक्षमुल्लर म्हणतो हीं इ. स. पूर्वी ६०० पासून २०० वर्षां पावेतों झालीं ; आम्हीं म्हणतों तीं इ. स. पूर्वी १२०० पासून ६०० वर्षां पावेतों झालीं.

या भागाच्या प्रस्तावनेंत २७ नक्षत्रांची पद्धती हिंदुस्थानांतलीच आहे अगर दुसऱ्या देशांतून तेथें आलेली आहे ? या प्रश्नाचा विचार केला आहे. बायत हा फ्रान्स देशाचा ज्योतिषी म्हणतो कीं, हिंदूनीं ही पद्धती चीन लोकांपासून घेतली. लासन आणि व्हिटनी ह्या विद्वानांनीं त्याचें म्हणणें मान्य केलें, परंतु बर्लीन येथील फ्रोफेसर वेबर हा अगदीं त्यास विरुद्ध आहे मोक्षमुल्लर यांचेंही मत ही पद्धती चीन देशांतून आली अशा म्हणण्यास विरुद्धच आहे. हा वर लिहिलेला प्रश्न फार उत्तम आहे, परंतु याचा निकाल करण्यासारखें साधन अद्यापि आमच्या जवळ नाहीं. तरी इतकें खरें आहे कीं, संस्कृत शब्द **नक्षत्र** चिनी शब्द **सियू** आणि आरबी शब्द **मानूजिल** या तिघांची प्रवृत्तिनिमित्तें व अवयवार्थ एकसारिखेच आहेत. सियू (याचा अर्थ २८ नक्षत्रें) याचामूलार्थ रात्रीं राहणें हा कनफ्यूशिअस याच्या ग्रंथांत पुष्कळ वेळां आढळतो; चिनी भाषेंत याची खूण छपराखालीं एक मनुष्य ही आहे. मानूजिल हा शब्द कुराणांत दोन ठिकाणीं आढळतो; याचा अर्थ रात्रींराहाण्यास स्थल असा आहे. नक्षत्र[२] याचाही अर्थ थेट असाच आहे. नक्‌ याला त प्रत्यय लागून जो नक्त शब्द होतो त्याचा अर्थ रात्र असा आहे. त्यापासूनच नक्षत्र शब्द निघाला आहे. नक्ष् धातूचा अर्थ मुकामा-

१ असें त्याच ग्रंथाच्या शेवटीं लिहिलें आहे.

२ "नभ्राणूनपात्" या सूत्राच्या वाख्येंत नक्षरतीतिनक्षत्रं ( जें हालत नाहीं तें नक्षत्र. अशी व्युत्पत्ति केली आहे, ती सयुक्तिक दिसत नाहीं.

त येणें. उतरणें, आणि नक्षत्र याचा अर्थ उतरायाचें ठिकाण, मुकामाची जागा. मोक्षमुल्लर याच्यामतें नक्षत्रशब्द तारा या अर्थी रूढ आहे; परंतु आमच्या मतीं तो यौगिग आहे. प्राचीन सूक्तांपासून अर्वाचीन सूक्तांपर्यंत तो जेथें आढळतो तेथें त्याचामुख्यार्थ भ्रमण करणारा चंद्र आकाशांत ज्या स्थलीं थांबत असतो अशीकल्पना आहे तीं स्थळें" हाच आढळतो. कांहीं अत्यंत प्राचीन सूक्तांतही नक्षत्र शब्द आढळतो ही चमत्कारिक गोष्ट आहे. उदाहरण, "नक्षत्रायंत्यक्तुभिः" यावरून कण्व, गोतम, विश्वामित्र, इत्यादि मंत्रद्रष्ट्यांस ही नक्षत्रें अवगत होतीं, तेव्हां ज्योतिषाचें ज्ञान फारच प्राचीन कालापासून आहे असें साफ दिसतें.

हिंदुलोकांत नक्षत्रांची संख्या २७ होती अथवा २८ होती? हाही एकप्रश्न मोक्षमुल्लर यानें केला आहे. वायत म्हणतो, मूळची संख्या २८ परंतु संपातस्थळ बदलल्यामुळें अभिजित नक्षत्र दिसेनासें होऊन बाकी २७ च नक्षत्रें राहिलीं. मोक्षमुल्लर म्हणतो, आकाशाचे २७ भाग सारखे होतात (हें म्हणणें आम्हास कांहींसें संशयित दिसतें) सबब नक्षत्रांची संख्या २७ च होय. आमचें मत वायत आणि व्हिटनी यांच्या प्रमाणेंच नक्षत्रांची मूळ संख्या २८ होती असें आहे.

अथर्ववेदसांहितेच्या १९ व्याकांडांत २८नक्षत्रें सांगितलीं आहेत. निरनिराळ्या नक्षत्रांचें नामनिर्देशपूर्वक गणन ज्यांत केलें आहे असें फार प्राचीन पुस्तक हेंच दिसतें. कृष्ण यजुर्वेदांत कांहीं ठिकाणीं २७ हीच संख्या सांगितली आहे; परंतु त्याच ग्रंथांत व तैत्तिरीय ब्राह्मणाच्या तिसऱ्या पंचिकेंत २८ च संख्यासांगितली आहे.

---

## निबंध२ रा.

या चवथ्या भागांत सायनाचार्याच्या भाष्यासहित बहुतेक सप्तम मंडल (२०व्या पासून १०४ थ्या सूक्तांपर्यंत) आणि समग्र अष्टम मंडल (याची सूक्तें १०३ आहेत) इतकी संहिता आहे. नवम आणि दशम हीं दोन मंडलें राहिलीं आहेत तेवढीं छापलीं म्हणजे ऋग्वेदाची संपूर्ण संहिता प्रसिद्ध झाली.

आजपर्यंत छापलेल्या प्रत्येक भागास छापणारानें अनुक्रमणिका केली आहे. तींत प्रत्येक सूक्ताचा आरंभ त्यांतील ऋचांची संख्या, त्याचा ऋषी म्हणजे द्रष्टा (ज्यास देवतेनें प्रत्यक्ष सूक्ताचा उपदेश केला तो,) त्याची देवता, आणि त्याचा छंद हीं दिलीं आहेत. ही अनुक्रमणिका सर्वानुक्रम ग्रंथावरून केली आहे. वेद हे यज्ञयागादि कर्मांसाठींच झाले आणि त्या यज्ञयागादि कर्मांत ऋषि, देवता आणि छंद यांचें ज्ञान अवश्य असलेंच पाहिजे असें आहे. त्यापक्षीं ही अनुक्रमणिका फार उपयुक्त आहे. हें विशेष चांगलें समजण्यास यज्ञकर्माची माहिती पाहिजे. मंत्राचे ऋषि, देवता आणि छंद यांचें ज्ञान आवश्यक आहे. यापैकीं ऋषि आणि देवता सोडून देऊन छंदांविषयीं येथें थोडेंसें लिहितों.--मंत्रांचीं छंदें अथवा वृत्तें ह्मणजे ज्या लांबी रुंदीच्या परिमाणांत ते मंत्र रचले आहेत तीं परिमाणें. कोणताही मंत्र ह्मणतेवेळीं त्याचे ऋषि देवता आणि छंद यांचा उच्चार करावा लागतो. या छंदांत अक्षरसंख्येचा नियम असतो, ह्मणजे निरनिराळ्या अक्षरसंख्येवरून निरनिराळीं छंदें ठरविलीं आहेत. ऋग्वेदसंहितेंत एकंदर १०१७ सूक्तें आहेत. इतक्यांचीं मिळून १९ प्रकारचीं छंदें आहेत. यांतलीं अर्धीअधिक विरळा आढळतात. वारंवार येणारीं अशीं ७ आहेत. त्यांतही गायत्री, त्रिष्टुप्, अनुष्टुप् आणि जगती हीं नेहेमीं आढळतात. सर्वांत गायत्री छंदाचें माहात्म्य जास्ती आहे. देवांचा उपाध्याय जो अग्नि त्याचें हें छंद होय. हें ब्राह्मणजातीस विशेषतः सांगितलें आहे. यास आठआठ अक्षरांचे तीन चरण असतात. त्रिष्टुप् या मध्यें अकरा अकरा अक्षरांचे चार चरण असतात. देवांचा राजा इंद्र याचें हें छंद होय आणि क्षत्रिय जातीस हें विशेष उक्त आहे जगती यामध्यें बारा बारा अक्षरांचे चार चरण असतात. हें पशुप्रापक आहे आणि वैश्यजातीस विशेष उक्त होय. एखाद्यास पशु पुष्कळ पाहिजे असल्यास त्यानें यज्ञांतल्या कितीएक कृत्यांत जगती छंदाचे मंत्र ह्मणावे, असें सांगितलें आहे. कारण, त्या छंदाच्या अंगीं पुष्कळ पशु उत्पन्न करण्याची शक्ति आहे. गायत्री छंदाची शक्ति अशी आहे कीं, त्यानें म्हणणाऱ्यास तत्वज्ञान द्यावें व त्यास पुनीत करावें. छंदें हीं देवतें मानिलीं आहेत. हीं ब्रह्मदेवाच्या आसनासन्निध बसलीं आहेत आणि वर्तमानवाहक तारांप्रमाणें जे

कोणीं कांहीं मागेल तें ब्रह्मदेवाच्या कर्णांत सांगतात. वेदाच्या ऋचा जशा अनादि तशीं हीं छंदेंही अनादि असें मानलेलें आहे.

सातव्या मंडलांतील सर्व सूक्तें वसिष्ठ अथवा त्याचे वंशज यांचीं आहेत. वसिष्ठ हा सप्तऋषींपैकीं एक होय. हे सप्तऋषि आकाशांत उगवलेले प्रत्यहीं दृष्टीस पडतात. विश्वामित्र हा जन्मतः क्षत्रिय असून आपणास ब्राह्मणाचे सर्व अधिकार मिळावे ह्मणून फार झटत होता, त्यामुळें त्याचा आणि वसिष्ठाचा मोठा द्वेष पडला होता व त्यावरून ज्या अनेक कथा झाल्या आहेत त्या पुराणांतून पुष्कळ प्रसिद्धच आहेत. ब्राह्मणाचे अधिकार न देण्याविषयीं वसिष्ठानें पुष्कळ आग्रह धरिला; तरीं अखेरीस सर्व अधिकार देणें भाग पडलें. आणि आतां वर सांगितलेल्या सप्तऋषींत ताऱ्यांच्या रूपानें दोघेही प्रकाशत असतात. आणि त्या दोघांचेही वंशज (कौशिक आणि वासिष्ठ या गोत्रांचे ब्राह्मण) समान अधिकार अनुभवीत आहेत. या वसिष्ठाच्या सूक्तांत पंजाबामध्यें व दुवाबामध्यें (असें दिसतें) निरनिराळ्या लोकांत लढाया झाल्याविषयीं पुष्कळ लेख आढळतात. सुदाम या राजाचा कुळगुरु वसिष्ठ ऋषि यानें सुदामावर मोठे उपकार केले. ते असे कीं, देवांचा राजा इंद्र याजकडून सुदामास साह्य देववून कितीएक लढायांमध्यें त्यास जय मिळवून दिला. या सगळ्या मंडलांत दोन ऋचा मुख्य आहेत. रथंतर ह्मणून जें प्रधान साम सोमपानाच्या समारंभांत गात असतात तें त्याच ऋचांचें साम होय. या सामानें यज्ञ करणारास स्वर्गास नेणें व साह्य करणें इंद्राला भाग पडलें, असा समज आहे. (याचा आरंभ अभित्वा शूरोनोनुमो) सर्व ऋषि या सामावर फार श्रद्धा ठेवीत असत. ऋग्वेदसंहितेमध्यें हें कितीएक वेळां लिहिलें आहे. याचा अर्थः—"आह्मी (मादक जो सोमरस तो पुष्कळ घेऊन) तुला स्तवितों. हे वीरा, जशा दूध न काढलेल्या गाई (तट फुगलेल्या स्तनांनीं हंबरत असतात तसे) इंद्रा, जंगम अथवा स्थावर, म्हणजे सर्व जगत् जें आहे त्या सर्वांचा स्वामी (असा आह्मी तुला स्तवितों.) तूं जिवंत आहेस (शब्दशः सूर्यातें पाहात आहेस) स्वर्ग लोकीं व मृत्यु लोकीं तुज प्रमाणें एक ही प्राणी नाहीं. असा दुसरा कोणी पूर्वीं झाला नाहीं व पुढें होणार नाहीं. हे शक्तिमान् इंद्रा, घोडे, अन्न, गाई, हीं इच्छिणारे आम्ही तुला प्रार्थितों." पुढच्या वैदिक ग्रंथांत या मंत्रांच्या शक्तीविषयीं

विलक्षण गोष्टी आहेत. कौशितकि उपनिषदांत रथंतर साम हें ब्रह्मदेवाच्या मंचकाचें उत्तरेच्या आंगचें लांब गात आहे असें सांगितलें आहे. या भागांतलीं वसिष्ठाचीं सूक्तें ज्या देवतांस उद्देशून आहेत त्या—इंद्र, देवांचा राजा, युद्धाची देवता, आणि सोमरस पिण्याविषयीं आनंदी; मरुत्, वादळाची देवता; अश्विन, (अश्विनीकुमार) देवांचे वैद्य; वरुण, आयुष्य व मृत्यु यांचा स्वामी आणि विश्वाचा उत्पादक व पालक; उषा, प्रभातकालाची देवता; वायु, सोमरसाचा स्वाद प्रथम घेणारा प्रातःकाळचा वारा; विष्णु, दैनंदिन व वार्षिक या गतींमध्यें सूर्याचें नियमन करणारा; पर्जन्य, पावसाची देवता; बृहस्पति, देवांचा गुरु; सरस्वती वाग्देवता; विभु, देवांचे गण; आणि विश्वेदेव सर्व देव ( तेहतीस ) इत्यादि.

मंडूक ह्मणजे बेडूक यांजवर वसिष्ठाचें एक सूक्त आहे. याची मूळकथा अशी आहे, कीं पाऊस पडावा ह्मणून वसिष्ठानें एका सूक्तानें पर्जन्याची स्तुति केली. तेव्हां मंडुकांनीं त्याच्या बरोबर मोठ्या आनंदानें शब्द केला. तें ऐकून वसिष्ठ संतुष्ट झाला आणि त्यानें त्याजवर एक सूक्त (संवत्सरंशशयाना०) केलें त्याचें भाषांतर येणें प्रमाणें:—

भावानें यज्ञकर्माचें आचरण करणारे ब्राह्मण वर्षभर मौनधरणारे ( दीक्षेचा नियम संपल्यावर प्रार्थना आरंभतात ) तसे हे मंडूक ( बहुतेक सर्व वर्षभर निजून राहून) आतां पुनः शब्द करीत आहेत.

२. आकाशस्थ जलें हें (सरोवर ) आरण्यांत पडलेल्या चर्माच्या कोशाप्रमाणें भरतात. तेव्हां, वत्स मागें येत असून गाई जशा त्यां सुद्धां हंबरत आहेत, तसे मंडूक मिळून ओरडतात.

३. पर्जन्यकाळ आला ह्मणजे पर्जन्य (पावसाचा स्वामी) वृष्टीनें ( पाण्यासाठीं) उत्सुक (अशा) मंडूकांची तृषा शमवितो तेव्हां आनंदानें शब्द करितात. जसा मुलगा पित्यास ( अनुसरतो ) तसा एक (बेडूक) दुसऱ्याच्या मागून शब्द करतो.

४. पाऊस पडतो तेव्हां एक (बेडूक) दुसऱ्याकडे जाऊन त्यास भेटतो. आणि ते दोघें (पाऊसपडल्यामुळें) आनंद पावतात. मग तो पावसानें भिजलेला मंडूक इकडे तिकडे उड्या मारीत असतो आणि तो ठिपक्याचा ( मं-

डूक) हिरव्यारंगाच्या मंडूकाच्या शब्दाशीं आपला शब्द मिळवितो.

५. शिष्य गुरूचे शब्द बोलतो तसा एक (मंडूक) दुसऱ्याच्या शब्दास जाव देतो. पाण्यांतून जेव्हां तुह्मी आपला मधुर ध्वनि ऐकवितां तेव्हां सर्व तुह्मी प्रतिअवयवांत सुख असल्याचीं चिन्हें दाखवितां.

६. त्यामध्यें एक आहे तो गाईसारखा ओरडतो, दुसरा शेळीप्रमाणें बेंबावतो, यांत एक ठिपक्यांचा आहे, दुसरा हिरवा आहे. स्वरूप, वाणी आणि रंग हीं (याचीं) निराळीं आहेत तरी एक गोष्ट यांची सारखीच आहे. कारण ओरडत असतां ते सगळे आपापल्या वाणींत अनेक प्रकारचे ( उंच नीच ) स्वर काढतात.

७. रात्रौ सोमपान (अतिरात्र) करण्याच्या वेळचे ब्राह्मणाचे शब्द (सोमपात्रें ) सरोवराप्रमाणें भरलीं आहेत असें सुचवितात. तसे मंडूकानों, तुह्मी चोहोंकडे उड्या मारतां त्या दिवशीं आह्मांस वृष्टि प्राप्त होते.

८. सोमरसाच्या आनंदांत मग्न झालेले ब्राह्मण यज्ञकालांत समग्र वर्ष राहणारें पावित्र्य ( ब्रह्म ) उत्पन्न करतात ( त्यांच्या प्रमाणे ) मंडूक आपल्या वाणीचा प्रतिध्वनि पाडतात. घर्मांत लोळणारे अध्वर्यु गुप्तरीतीनें यजमानास दिव्यदेह उत्पन्न करण्या करितां घर्मपात्र तापवितात त्यांच्या प्रमाणें चोहोंकडे ( मंडूक ) दिसूं लागतात. एकही आपल्या बिळांत राहत नाहीं.

९. मनुष्यांप्रमाणें ते (मंडूक) वर्षांतील ऋतुव्यवस्था पाळतात. अध्वर्यु योग्यकाळीं तापलेलीं घर्मपात्रें ( आंतील दूध वगैरे पदार्थ ) टाकून देतात तसे प्रतिवर्षीं पाऊस (काल) आला ह्मणजे (मंडूक आपलीं बिळें सोडतात.)

१०. मंडूक आह्मांस ऐश्वर्य देओत; गाईप्रमाणें ओरडणारा व शेळीप्रमाणे ओरडणारा, टिपक्याचा व हिरवा, हे मंडूक आह्मांस ऐश्वर्य देओत. आह्मांस शतशः गाई देणारे मंडूक हजारो ( वनस्पति ) उत्पन्नकरणाऱ्या ( या ) ऋतूंत आमची आयुष्ये वाढवोत.

या सूक्ताचें प्राधान्य आहे तें त्यांत मंडूकांविषयीं मजकूर असल्यामुळें नव्हे; तर अनेकवेळा ब्राह्मण शब्दाचा उच्चार असल्यामुळें आहे. या सूक्तावरून ब्राह्मण ह्मणून निराळी जात नाहीं. तर यज्ञक्रिया करणारे व ब्रह्म उत्पन्न करणारे ते ब्राह्मण. या सूक्तांत ब्राह्मणांची थट्टा आहे असें कोणाचें

मत होतें, पण तें रास्त नाहीं. वसिष्ठ त्या मंडूकांस दैविक प्राणी असें मानितो. म्हणूनच तो संपत्ती साठीं अग्नि, इंद्र, इत्यादि देवतांच्या प्रमाणेंच त्यांची प्रार्थना करितो. अवर्षण पडलें असतां पर्जन्यासाठीं अनुष्ठान करितात तेव्हां पर्जन्यसूक्तावरोबर हेंही सूक्त ह्मणतात.

वसिष्ठाच्या कितीएक सूक्तांत कवितेचे खरे गुण व गंभीर विचार हे आढळतात. उदाहरणार्थ वरुणस्तुति ( धीरात्वस्य महिना० ) मधल्या कांहीं ऋचांचें भाषांतर खालीं लिहितों तें पाहावें.

१ ज्यानें आकाश आणि पृथ्वी अगदीं विभागून दोन विशाळ (मंडलें) केलीं त्याच्या सृष्टि (रचना) बुद्धिमत्तेच्या व सामर्थ्याच्या आहेत. चकचकीत शोभायमान आकाश त्यानें वर उचललें, ताऱ्यांनीं युक्त आकाश आणि पृथ्वी हीं निरनिराळीं दूर पसरलीं.

३ हे वरुणा, माझा अपराध समजावा हें मनांत धरून मी (त्याचें कारण) विचारतों. जे ज्ञाते आहेत त्यां (सर्वां) कडे विचारण्याकरितां मी निरनिराळा जातों. ते सर्व मला एकच सांगतात. (तें हें कीं,) तुजवर वरुण रागावला आहे.

५ आमच्या पूर्वजांच्या व स्वतः आमच्या (दुराचरणाच्या) परिणामापासून आह्मांस सोडीव. हे राजा (वरुणा) लुटलेल्या पशूंचा आहार करणारा चोर (सुटतो) याप्रमाणें (ज्या पाशांनीं तूं बांधिलें आहे त्यांपासून) वसिष्ठास सोडीव, वत्स दाव्यापासून सोडल्याप्रमाणें त्याला (वसिष्ठाला) सोडीव.

वसिष्ठास जलोदर रोग झाला होता तेच पाश होत. कारण, जाणून अथवा चुकून कोणी सृष्टिनियमाला विरुद्ध वागल्यास त्यास वरुण जलोदर रोग उत्पन्न करी असा समज होता.

---

## निबंध ३ रा.

दाहा मंडलां पैकीं पहिल्या सात मंडलांत सूक्तांचे द्रष्टे जे ऋषी यांच्या अनुक्रमानें सूक्तें लिहिलीं आहेत. परंतु पुढच्या तीन मंडलांत असें नाहीं. मूळचे कुलपुरुष व त्यांचे वंशज यांपासून गुरुसंप्रदायानें परंपरया चालत आलेलीं सूक्तें प्रत्येक मोठ मोठ्या कुळांतल्या लोकांनीं एकत्र जमविलीं, तीं

त्या पहिल्या सातभागांत आहेत; म्हणजे विश्वामित्राच्या वंशातल्या लोकांनीं विश्वामित्राचीं सूक्तें जमविलीं. हीं तिसऱ्या मंडलांत आहेत. विश्वामित्राचा प्रतिस्पर्धि वसिष्ठ याच्या वंशजांनीं याचीं सूक्तें जमवलीं हीं मागें लिहिल्याप्रमाणें सातव्या मंडलांत आहेत. ऐश्वर्य व महत्व मिळण्याचें साधन ब्राह्मणांस एवढेंच होतें, त्यामुळें त्यांनीं हीं सूक्तें जशींच्या तशींच आपल्या जिवापलीकडे बाळगलीं. ज्या भाग्यशाली कुळांपाशीं यांतलीं कांहीं सूक्तें होतीं त्यांस तीं कामधेनुप्रमाणें होतीं. कारण, या जगांत सर्व यश अपयश त्या मंत्रांच्या अनुष्ठानावर होतें.

आठव्या मंडलांतल्या सूक्तांस प्रगाथ ह्मणतात. हीं निरनिराळ्या ऋषींचीं आहेत. तेव्हां तीं एका ऋषीच्या वंशजांनीं संगृहीत आहेत असें ह्मणवत नाहीं. या मंडलांतल्या कांहीं सूक्तांचा ऋषि प्रगाथ नावांचा आहे खरा, परंतु मंडलांस प्रगाथ हें नांव त्याच्या नांवावरून पडलें नाहीं. त्याच्यापेक्षां ज्यांचीं सूक्तें या मंडलांत अधिक आहेत असे ऋषि वहुत आहेत, तेव्हां ऋषींच्या नांवावरून नांव पडणें तर त्यांपैकीं कोणाएखाद्याचें पडावें हें योग्य आहे. प्रगाथ याचा पारिभाषिक अर्थ आहे तो हा कीं, सोमयज्ञांत मध्यान्ह हवनाच्या वेळेस गाण्याच्या सामाच्या बरोबर ह्मणण्याच्या एका विशेष छंदांतल्या ऋचा. उद्गाते जी ऋचा ह्मणत असतात तींतलेच शब्द त्या प्रगाथाच्या ऋचांपैकीं एकींत नेहमी असतात. प्रगाथ हे एक प्रकारच्या प्रार्थनांचा भाग आहे. त्या प्रार्थनांस शस्त्रें ह्मणतात. उदारण, माध्यान्ह हवनाच्या वेळच्या प्रथम प्रार्थनेस मरुत्वतीयशस्त्र ह्मणतात. इंद्रानें असुरांबरोबर ज्या लढाया केल्या त्यांत मरुत् हे इंद्राचे सखे होते, ह्मणून मरुत्वतीय शस्त्रानें मरुतांस इंद्रासह येण्याविषयीं प्रार्थना आहे. पहिल्या दोन ऋचांनंतर तिसरींत स्वतः इंद्रासच हवनाजवळ येण्याविषयीं प्रार्थनापर ऋचा (इंद्रान्यदीया०) आहे. तिचें भाषांतर येणें प्रमाणेः—

इंद्रा, यज्ञांत राहणाऱ्या ज्या शक्ति त्यांसहवर्तमान जवळ ये. परमानंदी तूं, तुझ्या स्वतांच्या उत्तम शकुनांच्या साहित्यासुद्धां (जवळ ये.)

याप्रमाणें या आठव्या मंडलांत वहुतेक सूक्तें प्रगाथ आहेत, परंतु कांहीं सूक्तें व ऋचा प्रगाथाखेरीजही आहेत. आणि त्यांचें स्वरूप अगदीं पृथक् आहे

या प्रगाथाच्या ऋषींच्या नावांत वैवस्वतमनु, (सर्व सृष्टीच्या आरंभींचा

मनुष्य,) काव्य उशना, (फार प्राचीन ऋषि,) त्रित, (फार प्राचीन वैद्य,) (हे, ऋग्वेदांत दुसऱ्याही पुष्कळ ठिकाणीं आढळतात.) या अत्यंत प्राचीन ऋषीं-चीं नांवें आढळतात. हे ऋषि विश्वामित्र, वसिष्ठ, काश्यप, भारद्वाज, इत्यादि जे ऋषि झाले त्यांच्या फारच अगोदरचे होत. यांच्या सूक्तांवरून, वैदिक धर्माचें जें स्वरूप नजरेस येतें तें पुढच्या ऋषींनीं लिहिलें आहे त्यापेक्षां फार प्राचीन आहे. त्यांनीं देवांचीं नांवें लिहिलीं आहेत, तीं दुसऱ्या आर्य-लोकांच्या धर्मपुस्तकांत सांपडतात व त्यांच्या कल्पना दुसऱ्या आर्य लोकांच्या कल्पनांशीं बरोबर मिळतात. अप्तऋषीचा मुलगा त्रित हा "जेंदावेस्ता" यांत प्रसिद्ध आहे. त्रिताचें आठव्या मंडलांत जें सूक्त आहे त्यांतील विषय "वेंदिदाद" ह्मणून जो पारशी ग्रंथ आहे त्याच्या विसाव्या अध्यायांतल्या विषयाशीं फार मिळतो.

आठव्या मंडलांतील कितीएक सूक्तांचे द्रष्टे ऋषि आढळतच नाहींत. आणि प्रत्येक सूक्तास ऋषि असला पाहिजे असा तर सिद्धांत आहे. त्याकरितां ज्यांस ऋषि आढळत नाहीं त्यांस कांहीं कल्पनांनीं ऋषि लाऊन दिले आहेत. उदाहरण, यांतल्या ६७ व्या (त्यान्नुक्षत्रियां अव०) सूक्तास कल्पनेनें मत्स्य (मासे) हाच ऋषि लाविला आहे. कारण, त्याच्या आठव्या ऋचेंत "आह्मास कोणत्याही पाशानें बांधूं नये" आणि अकराव्या ऋचेंत "तितक्या खोलीवर गेले ह्मणजे" असे शब्द आढळतात; तेवढ्यावरून, जाळ्यांत सांपडलेले मासेच असे बोलतील, अशी कल्पना बांधून तेच त्या सूक्ताचे ऋषि केले.

या मंडलाच्या ऋषींमध्यें अपाला नामें एक स्त्री आढळते. ती अत्रि ऋषिची कन्या असें म्हणतात. यांतलें ९१ वें सूक्त (————) तिचें आहे. त्यांत तिच्या शरीराचा चर्मरोग सोमरसानें व तिचें शरीर रथाच्या कण्याच्या छिद्रांतून व जोकडाच्या छिद्रांतून ओढून काढण्यानें बरा झाल्याविषयीं चमत्कारिक कथा आहे. अपालेस चर्मरोग असल्यामुळें तिच्या नवऱ्यानें ती टाकिली. शोकानें व्याप्त अशी होऊन ती नदीवर जात असतां तिला वाटेंत सोमवल्ली आढळली. तिनें तिच्या शाखा घेऊन दांतांनीं चावून त्यांचा रस काढला. इंद्र सोमरसास भुलून तिच्या जवळ आला

ल्हां तिनें आपल्याच दातांनीं काढलेला रस पिण्या करितां इंद्रास बोलाविलें. तिन ... त्या व्याधिग्रस्त शरीरावर पुनः रोम उगवण्याविषयीं आणि ... केंस उगवण्याविषयीं इंद्रापाशीं वर मागितला. इंद्रानें-
ा तिनें आपणा करितां सोमरस तयार केला हें जाणून तिनें इच्छिलेला वर
ला देऊन सूर्या प्रमाणें चमकणारी नवीन त्वचा दिली. हें लाहानसें सूक्त
ारोखरी मोठें मौजेचें आहे. आणि यांत कवितेचे खरे गुण आहेत. या
ागांत दानस्तुति आणि वालखिल्यें अशीं आणखी दोन प्रकारचीं सूक्तें आ-
ह. ज्यां सूक्तांत काहीं यज्ञकर्म उत्तम रितीनें सिद्धीस नेल्यामुळें राजानें
सन्न होऊन ऋत्विजांस दिलेल्या दानांची त्यांनीं ( ऋत्विजांनीं ) प्रशंसा
ली आहे, तीं दानस्तुतीचीं सूक्तें होत. या सूक्तांत थोडयाशा ऋचा असता-
, त्यांत दात्याचें आणि दानांचीं नांवें असतात. हीं दानें मुख्यत्वें करून गा-
घोडे, खेचरें, उंट, सोनें आणि मोठमोठे पोषक हीं होत. प्रगाथ व दान-
ुति हीं एके ठिकाणीं सांपडतात. याचें कारण तीं दोन्हीं एकाच समयीं
म्हणजे सोमयज्ञांत मध्यान्ह हवनाच्यावेळीं ) म्हणण्याचीं असतात. आ-
ा दानें ( दक्षिणा ) देण्याचाही योग्यकाळ तोच होय. अग्निष्टोम म्ह-
ान सामान्य सोमयज्ञ आहे, त्याची दक्षिणा ११२ गाई अथवा त्यांचें मूल्य
तकी सांगितली आहे. परंतु राजेरजवाडे अर्थात ऋत्विज्जांस विपुल दक्षि-
ा देत असत. आणि ऋषि स्तुति करितात ती सामान्य प्रतीच्या दक्षिणेची
- तशी मोठी दक्षिणा असली तरच ती स्तुतीस पात्र होत असे, एरवीं
... या दानस्तुतींत पंजावाच्या राजानें ऋषींस लक्षोपलक्ष गाई दिल्या
ा. ...सें आहे. ही अतिशयोक्ति दिसते. कारण एवढयाशा राजास इतक्या
ई प्राप्त होणें असंभवी[1] आहे.

४९ सा पासून ६० पर्यंत जीं सूक्तें तीं वालखिल्यें होत. हीं मागून सा-
ाल केलेलीं दिसतात. यांवर व्याख्या आढळत नाहीं, म्हणून मोक्ष मुल्लर
ानें नुसतें मूळच छापिलें आहे. हीं वालखिल्यें सर्वपृष्ठ अप्तोर्याम, द्वादशा-
इत्यादि मोठमोठया यज्ञांत मात्र येतात. येथें त्यांस वालखिल्य शास्त्रें अ-

१ परंतु इतक्या गाईंचें मुल्य (म्हणजे लाख गाईंस, पाचापासून दहा लाख पर्यंत रुपये मानानें) देण्याना कदाचित् संभव आहे.

सें म्हणतात. हीं शस्त्रें म्हणणें फार कठीण आहे अशी प्रसिद्धि रण त्यांतल्या कितीएक ऋचा एका दमांत म्हणाव्या लागता[illegible] आतिशय संचार आहेत, व एका ऋचेंतले शब्द दुसऱ्या ऋच[illegible] म्हणावे लागतात. असुर लोक गाई नेऊन एका विवरांत लपवून ठेवतात आणि इंद्र त्यांच्या शोधासाठीं लढत असतो, तेव्हां हीं शस्त्रें त्या विवराचा भेद करतात असें मानित आहे. या गाई म्हणजे स्वर्गीय उदकें होत. आणि अवर्षण पडतें तेव्हां असुर या गाईंस नेऊन विवरांत लपवितात. नंतर इंद्रानें लढून त्यांस सोडविल्यावर पृथ्वीवर वृष्टि होऊन सुबत्ता होते.

# जाहिरात.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें व जिनसा मुंबईंत "इंदुप्रकाश" हपिसांत डाक हाशिला सुद्धां पैसा पाठविला असतां रवाना केल्या जातील:—

१ सर्व प्रकारचीं मुंबईंत मिळणारीं इंग्रजी व मराठी बुकें व पुस्तकें.

२ सन १८६० चा ४५ वा आणि१८६१चा२५वा या आक्टांची जंत्री.—किं० आणे ४, डाकहशील वगैरे एकास व दाहास२आणेच पडतें.

३ रा० दामोदर वासुदेवजी यांचीं निरनिराळ्या रोगांवरील औषधें, मात्रा, भस्में वगैरे.

४ रा० बाबापदमनजी यांचा मोलस्वर्थकृत कोशाचासंक्षेप. (मराठी आणि इंग्रेजी डिक्शनरी.) किं०रु०५व ६. डाकहशील ६ आणे.

५ मुंबईचें वर्णन, हें पुस्तक नुकतेंच तयार झालें आहे. किं० रु० ३॥· आणि डाक हशील ·।· आणे.

लहान पुस्तकें एकाहून अधिक मागविल्यास डाकहशिलाचा फायदा आहे. खेरिज इंदुप्रकाशाचे मालक सर्वांस असें कळवितात कीं, मुंबईहून कोणताही जिन्नस पाहिजे असल्यास ते चांगला व चौकशीनें खरेदी करून पाठवितील. परंतु पैसा मात्र पूर्वीं पाठविला पाहिजे.